रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक २२१
www.ramprahar.com
बुधवार, २६ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

पेणच्या आमसभेत प्रश्नांची सरबत्ती; अधिकारी निरुत्तर/२
कारागृहातील बंदीवानांसाठी ऑनलाइन फोन सुविधा/५
महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत सोहेल शेखला रौप्यपदक/८

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर



**नवी दिल्ली** : अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी लांबणीवर पडल्या आहेत. या संदर्भात मंगळवारी (दि. २५) सर्वोच्च न्यायालयात होणारी सुनावणी पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही सुनावणी ४ मार्च रोजी होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील ओबीसी आरक्षण, नगरसेवक संख्या, प्रभाग रचना अशा विविध मुद्द्यांवरून न्यायालयात अनेक याचिका दाखल झालेल्या आहेत. या सर्व याचिका एकत्र करून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. जवळपास दीड वर्षापासून या याचिका प्रलंबित आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर न्यायालयीन प्रक्रिया लवकर संपून निकाल जाहीर होईल व निवडणूक प्रक्रिया सुरू होईल, अशी चर्चा सुरू होती, मात्र यावर अद्याप न्यायालयाने कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. या संदर्भात आता ४ मार्चला पुढील सुनावणी होणार आहे.

# पनवेल मनपाचा कोणतीही करवाढ नसलेला 3873 कोटींचा अर्थसंकल्प

## पायाभूत सुविधांबरोबरच गतिमान प्रशासनावर भर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचा सन २०२५-२०२६चा ३८७३ कोटी ८६ लाखांचा वस्तुनिष्ठ, विकासाभिमुख व कोणतीही करवाढ नसलेला अर्थसंकल्प मंगळवारी (दि. २५) आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी सादर केला. यात महापालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधांबरोबरच गतिमान प्रशासनासाठी विविध उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे यांनी स्थायी समितीच्या बैठकीत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्याकडे अर्थसंकल्प सुपूर्द केला. या वेळी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, नगररचना अधिकारी केशव शिंदे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे, उपमुख्य लेखापरीक्षक संदीप खुरपे, कार्यकारी अभियंता, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, डॉ. रूपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**



*उत्पन्नवाढीवर भर देणारा, आरोग्य सुविधांची वृद्धी करणारा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नव्या शैक्षणिक संकल्पनांचा प्रभावी वापर करणारा, भविष्याचा दुरगामी विचार करून नव्या जलस्रोतांचा शोध घेणारा, शहर स्वच्छ करण्यासाठी लोकसहभागावर भर देणारा, पर्यावरण संरक्षण व संवर्धन करणारा हा अर्थसंकल्प आहे.*

**-मंगेश चितळे**, आयुक्त, पनवेल महानगरपालिका



*पनवेलचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे याचा आरसा दाखविणारा हा अर्थसंकल्प आहे. महापालिका क्षेत्रात सध्या सुरू असलेली कामे चालूच राहतील व नवीन कामेही केली जातील. महापालिकेकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा उच्च राहील अशी काळजी घेण्यात आली आहे. त्याबद्दल मी आमदार प्रशांत ठाकूर आणि आयुक्त मंगेश चितळे यांचे अभिनंदन करतो.*

**-परेश ठाकूर**, माजी सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका

### वैद्यकीय व आरोग्यसेवा

नागरिकांना वैद्यकीय व आरोग्यसेवा पुरविण्यावर महापालिका कायमच भर देत आली असून यासाठी या वर्षी १२६ कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे. याबरोबरच महापालिका हद्दीमध्ये हिरकणी माता व बाल संगोपन केंद्र-सर्वसमावेशक ४५० बेडचे हॉस्पिटल उभारणीसाठी १७.५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. काळुंद्रे, नवीन पनवेल, खारघर येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. महापालिका हद्दीतील प्रभाग समिती ब कळंबोली येथे ५० बेडचे हॉस्पिटल बांधण्याकरिता १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### अग्निशमन आणि सुरक्षा व्यवस्थापन

यासाठी एकूण ३९ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये अग्निशमन विभागासाठी ॲडव्हान्स फायर इंजिन व ॲडव्हान्स इमरजन्सी रेस्क्यू टेंडर अशी दोन वाहने तसेच टर्नटेबल लेंडर २२ मीटर, वाहन बॉडी बांधणी व पुरवठा करण्यात आले आहे. वॉटर बाउझर वाहन खरेदीसाठी ७.३५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अग्निशमन विभागासाठी ७० मीटर उंचीचे अरायल लॅडर प्लॅटफॉर्म वाहन खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे तसेच कामोठे येथे अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी १७ कोटींची तरतूद आहे.

### शाळा व अनुषंगिक कामे

नूतन शाळा बांधकामासाठी ३४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मनपा शाळांना सोयीसुविधा, शिक्षक वेतन व विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यवाढीसाठी ८३ कोटींचा भरीव निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. रायगड जि. प.ने बांधलेल्या शाळांची दुरूस्ती करण्यासाठी १०.७२ कोटींचा निधी आहे.

### भुयारी गटार व मलनिःसारण

यासाठी एकूण १७८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये कामोठे मलनिःसारण केंद्रांतर्गत १५ दललि क्षमतेचे पाणी पुनर्वापर प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी ४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. से. १९, २०, २१करिता ६.५ दललि क्षमतेचे मलनिःसारण केंद्र उभारणीसाठी २५.४९ कोटींची तरतूद आहे.

## राज्य डेटा धोरणास मान्यता




**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरण आणि या धोरणाच्या मसुद्यास मंगळवारी (दि. २५) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

शासनाच्या विविध विभागांकडे एकत्र होणाऱ्या माहिती (आधारसामग्री-डेटा)चा गतिमान कामकाजासाठी तसेच योजना, प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वापर करून घेण्याच्या दृष्टीने हे धोरण तयार करण्यात आले आहे. त्यासाठी महाराष्ट्र इस्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) संस्थेंतर्गत राज्य विदा प्राधिकरण स्थापन करण्यात येत आहे.

संगणकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात माहिती एकत्र केली जाते. ही माहिती-आधारसामग्री पूर्ण क्षमतेने कशी वापरता येईल याचा या धोरणात विचार केला गेला आहे. विविध विभाग, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था तसेच उद्योगांकडील ही माहिती एकत्रित उपलब्ध झाल्यास कार्यक्षम व पारदर्शकपणे प्रशासकीय प्रक्रिया राबविता येणार आहे. या माहितीच्या वापराबाबत एकवाक्यता तसेच विभागांमध्ये उपलब्ध या आधारसामग्रीचे सार्वजनिक वापराकरिता सुलभ अदानप्रदान या धोरणात निश्चित केले गेले आहे.



**पनवेल : मॅजिक बस फाउंडेशन, तळोजा स्किलींग सेंटर व स्किल फॉर फ्युचर यांच्या माध्यमातून पदवी प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या समारंभाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांनी विज्ञान प्रदर्शनादेखील भेट देत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पाची माहिती घेतली तसेच नितळस येथील सोलर स्ट्रिट लाईटचे उद्घाटन केले.**

## निवडक

### काँग्रेसचे माजी खासदार सज्ज्न कुमार यांना जन्मठेप

**नवी दिल्ली** : १९८४मध्ये दिल्लीत उसळलेल्या शीखविरोधी दंगलप्रकरणी काँग्रेसचे माजी खासदार सज्ज्न कुणार यांनी राउज ॲव्हेन्यू न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सज्ज्न कुमार यांना १ नोव्हेंबर १९८४ या दिवशी सरस्वती विहार या ठिकाणी झालेल्या वडील-मुलाच्या हत्येप्रकरणी न्यायालयाने दोषी ठरवले होते. १२ फेब्रुवारीला हा निर्णय न्यायालयाने दिला. त्यानंतर मंगळवारी (दि. २५) त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.

### केजरीवाल सरकारच्या मद्य धोरणात २००२ कोटी बुडाले, 'कॅग'चे ताशेरे

**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीच्या विधानसभेत भाजपचे सरकार स्थापन झाल्यानंतर सोमवारपासून विशेष अधिवेशन सुरू असून मंगळवारी (दि. २५) कॅगचा अहवाल विधानसभेत सादर झाला. या अहवालात आप सरकार सत्तेत असताना मद्य धोरणाच्या अंमलबजावणीमुळे तब्बल २००२ कोटींचा महसूल बुडाल्याचे नमूद करण्यात आले आहे. याच प्रकरणात तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया व आपच्या काही नेत्यांना अटक झाली होती.

## पनवेलमध्ये उद्या 'संदीप वैभव... आणि कविता'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची जयंती आणि या दिवशी साजऱ्या होणाऱ्या मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त भाजप उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली 'संदीप वैभव... आणि कविता' ही वैभव जोशी आणि संदीप खरे यांच्या स्वरचित कवितांची मैफिल आयोजित करण्यात आली आहे. गुरुवारी (दि.२७) सायंकाळी ७.३० वाजता पनवेल शहरातील फडके नाट्यगृहात ही मैफल सादर होईल.

**कुसुमाग्रज जयंती व मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रम**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषेला राज्याच्या अधिकृत भाषेचा दर्जा मिळाला. त्यामुळे १ मे हा मराठी राजभाषा दिन किंवा मराठी भाषा दिन म्हणून ओळखला जातो. त्याचबरोबर २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या गौरवासाठी समर्पित आहे. १ मे हा मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाल्याचा दिवस, तर २७ फेब्रुवारी हा मराठी भाषेच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक योगदानाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो, ज्याद्वारे मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रसार केला जातो.

'संदीप वैभव...आणि कविता' हा लोकप्रिय मराठी काव्य कार्यक्रम आहे, ज्यामध्ये प्रसिद्ध कवी संदीप खरे आणि वैभव जोशी आपल्या कवितांचे सादरीकरण करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतात. त्यामुळे रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी वैभव बुवा (९०२९४१०६९९) किंवा अभिषेक पटवर्धन (८६६८३३२१५९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## कर्जतमध्ये मानवी शरीराचे तुकडे आढळल्याने खळबळ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात वेणगाव येथे मानवी शरीराचे तुकडे आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ही हत्या की आणखी काही असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

वेणगाव येथील पराडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निर्जनस्थळी अनोळखी पुरुषाच्या शरीराचे अवशेष आढळून आले आहेत. याबाबत ग्रामस्थांनी कळविल्यानंतर कर्जत पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या व्यक्तीचा मृत्यू महिनाभरापूर्वी झाला असावा, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

मयत व्यक्तीला कुणी तरी मारून नंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने या परिसरात टाकले का या दृष्टीने पोलीस तपास करीत आहेत. दरम्यान, हे अवशेष फॉरेन्सिक लॅब मुंबई येथे पाठविण्यात आले आहेत.




## गारेगार, रसरशीत कलिंगड



उरण : फेब्रुवारी महिन्यातच उन्हाचा तडाखा जाणवायला सुरुवात झाली आहे. तीव्र झळा व उकाड्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर गारेगार, रसरशीत कलिंगडांना मोठी मागणी आहे. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर कलिंगडांची आवक वाढल्याचे दिसून येते.

# आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सीएसआर निधीच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्राचा समतोल विकास साधणार

**मुंबई : प्रतिनिधी**

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. त्याकरिता विविध योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून सीएसआर निधीच्या माध्यमातून समतोल विकास साधला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




आदिवासी विकास विभाग आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) द्वारे सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण व आरोग्य सेवा जलदगतीने उपलब्ध होणे आवश्यक आहे. सीएसआर निधी केवळ महानगर प्रदेशात खर्च न करता समतोल विकासासाठी उपयोग करावा. तसेच या निधीच्या माध्यमातून शिक्षण व आरोग्य क्षेत्रात अधिकाधिक योगदान द्यावे.

आदिवासी समाजाला फार मोठा इतिहास व सांस्कृतिक वारसा आहे. या समाजामध्ये नियम, कायदा आणि मूल्ये होती. मात्र कालचक्राच्या ओघात हा समाज मागे पडला. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जात आहेत. या योजनांच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात नवी उमेद निर्माण करण्यात येत आहे. गर्भवती माता आणि बालकांना पोषण आहार मिळावा, यासाठी शासन विविध योजना राबवत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ९.५% लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे तर देशाच्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या १०% लोकसंख्या ही महाराष्ट्रामध्ये आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात आदिवासींचे अधिवास असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. आदिवासी समाजातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण व नैसर्गिक गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अनुसूचित जमातींच्या विकासाला गती देण्यासाठी आदिवासी विभागांने ही परिषद आयोजित केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी यांनी विभागाचे अभिनंदन केले. तसेच विभागाने आयोजित केलेल्या या परिषदेमध्ये सहभागी झालेल्या सर्व प्रतिनिधींचे स्वागत करून त्यांचे आभार मानले.

यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, आदिवासी विभागाच्या माध्यमातून सामाजिक भागीदारी असलेला सी एस आर फॉर चेंज हा उपक्रम पहिल्यांदाच हाती घेतला आहे. आपल्या सामाजिक दायित्व भागीदारीचा वापर आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी करणार आहोत. आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या योजनांसाठी कंपन्यांच्या सामाजिक दायित्व भागीदारीमुळे हात बळकट होणार आहेत.

आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी प्रास्ताविकात आदिवासी विकास विभागाच्या योजना तसेच आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी शासनस्तरावर सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त राजेंद्र भारूड यांनी आभार मानले.यावेळी उद्योग विभागाचे सचिव पी.अनबलगन, आयुक्त लीना बनसोड उपस्थित होते.चर्चासत्रामध्ये विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी आपले विचार मांडले. चर्चासत्राचे संचालन संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या प्रमुख श्रीतमा गुप्तभया यांनी केले.

# नवी मुंबई पालिकेचा देशी वृक्ष लागवडीचा संकल्प

## वृक्ष प्राधिकरणाचा ४९ कोटी ९४ लाखांचा अर्थसंकल्प सादर

**नवी मुंबई : बातमीदार**

२१व्या शतकातील शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबईला स्वच्छ सुंदर हरित व प्लास्टिक मुक्त शहर बनवून अधिक उत्तम आधुनिक शहर निर्मितीकडे अर्थात स्मार्ट सिटी कडे शहराचे वाटचाल सुरू आहे. शहरात आतापर्यंत २१६ प्रजातीतील १५ लाख २८ हजार ७७९ वृक्षांची नोंदणी आहे.

शहराला हरित शहर बनवण्यासाठी पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नवनवीन संकल्पना अमलात आणल्या आहेत. मालमत्ता कराच्या माध्यमातून वृक्ष उपकारापोटी जमा होणारी रक्कम वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत पर्यावरणातील विविध उपक्रमासाठी खर्च करण्यात येणार असून पालिकेने २०२५ - २६ या आर्थिक वर्षात नियोजन केले आहे. तसेच यापुढे शहरात देशी वृक्ष लागवडीचा संकल्प पालिकेने सोडला आहे.

शहर विकासाकडे लक्ष देताना उद्यानातील हिरवळीच्या पाला पाचोळ्या पासून खत निर्मिती करणे तसेच हवा प्रदूषण कमी करण्यासाठी अंदाजपत्रकात मोवेदन क्षेत्रातील वडविहीर बोरगाव कोयना वसाहत परिसर तसेच सीबीडी बेलापूर नेरूळ वाशी घणसोली कोपरखैरणे आणि आयुर्वेदिक या ठिकाणी ४२ लाख ८०० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे, अशी माहिती पालिकेने दिले आहे.

वृक्ष प्राधिकरणाच्या नियोजन समितीने ४० हेक्टर हरित क्षेत्रासाठी १ कोटी, शालेय विद्यार्थ्यांना वनस्पती शास्त्राची माहिती व्हावी त्याचा अभ्यासक्रमात उपयोग व्हावा यासाठी तसेच पर्यटकांना शहराच्या आकर्षण वाढवण्यासाठी कोपरखैरणे येथील निसर्ग उद्यानात आंतरराष्ट्रीय दर्जाचे बोटॅनिकल उद्यान तयार करण्याचे नियोजन केले असून त्यासाठी अंदाजपत्रकामध्ये ८० लाखाची तरतूद करण्यात आली आहे.

> ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणारा पर्यावरणाचा रास थांबवण्यासाठी वृक्ष प्राधिकरणामार्फत नवनवीन उपक्रम हाती घेण्यात आले आहेत त्यामुळे इतर ठिकाणची परिस्थिती पाहता नवी मुंबईतील प्रदूषणाचे पातळी ही स्थिरांकित आहे. भविष्यात देखील पालिकेच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेल्या उपक्रमांना लोकप्रतिनिधी सामाजिक संस्था वृक्षप्रेमी नागरिकांकडून सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे.
> -डॉ. कैलास शिंदे,
> आयुक्त नवी मुंबई महापालिका

भाजीपाला फळे फुले प्रदर्शनाचे आयोजन करण्यासाठी खाजगी व सार्वजनिक संस्थांना स्थान देण्यात आले असून उद्यानविद्या प्रदर्शन आणि वृक्ष मित्र पुरस्कार याकरिता शंभर लक्षात तरतूद करण्यात आली आहे. रस्ता दुभाजकामध्ये लागवड करण्यात आलेल्या शोभिवंत झाडांना पाणीपुरवठा करण्यासाठी ४७२.५० लाखांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच रस्ता दुभाजकांमध्ये आणि रस्त्याच्या दुतर्फा मोकळा जागेत सुशोभीकरण करण्यासाठी १५०० लक्ष इतकी तसेच वृक्ष फांद्या छाटणी करिता १७५ लक्ष ज्या ठिकाणी मोकळ्या भूखंडावर वृक्षारोपण करण्यात आले आहे त्या ठिकाणी कुंपण घालण्यासाठी १९५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## दिव्यांगांसाठी एसटी प्रवासात सुविधा व सवलतींचा लाभ

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने दिव्यांग व्यक्तींसाठी एसटी प्रवासात महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. राज्य शासनाने ७५ वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना मोफत एसटी प्रवास व महिलांना तिकीट दरात ५० टक्के सूट दिली आहे. त्याचप्रमाणे दिव्यांग व्यक्तींसाठी एसटी प्रवासात तिकीट दरात ७५ टक्के सवलत दिली आहे.



दिव्यांग व्यक्तींसाठी ६५ टक्के अपंग असल्याचे प्रमाणपत्र असल्यास त्या व्यक्तीला सोबत असलेल्या प्रवाशाला ५० टक्के तिकीट दरात सवलत मिळते. या निर्णयामुळे दिव्यांग व्यक्तींना आर्थिक दृष्ट्या मोठा फायदा होत आहे.

तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना अलिबाग येथील सरकारी रुग्णालयात प्रमाणपत्र घेण्यासाठी जावे लागते. परंतु महाराष्ट्र शासनाच्या तिकीट दरातील सवलतीमुळे सुमारे ११०० दिव्यांग व्यक्तींना आर्थिक मदतीचा मोठा हात मिळतो आहे.

शिवाय, दिव्यांग प्रवाशांच्या सोयीसाठी अनेक सुविधा उपलब्ध केली आहेत. बसस्थानकांमध्ये दिव्यांगांसाठी शौचालय, स्वच्छतागृह, व्हिल चेअर आणि रॅम्पची व्यवस्था अनिवार्य केली आहे. बसस्थानकात दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागणार नाही याची खबरदारी घेतली आहे.

## अलिबाग जिल्हा कारागृहात बंद्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाचा शुभारंभ

**अलिबाग : रामप्रहार वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने किमान कौशल्य विकास २०२४-२५ अंतर्गत अलिबाग जिल्हा कारागृह वर्ग २ मधील बंद्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि.२१ फेब्रुवारी रोजी करण्यात आले.




या कार्यक्रमाचे उद्घाटन सहाय्यक आयुक्त अमिता पवार यांनी केले. त्यांनी कारागृहातील बंद्यांना लॉंड्री सर्व्हिस प्रोव्हयडर आणि दु चाकी तंत्रज्ञ या कोर्सेसची माहिती देत त्याद्वारे भविष्यात स्वावलंबी कसे होता येईल यावर मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणासाठी प्रगती स्किल डेव्हलपमेंट सेंटर, पनवेल हे संस्था म्हणून सहकार्य करणार आहेत. संस्थेचे संचालक रविकांत चव्हाण यांनीही उपस्थित राहून प्रशिक्षणाचा आराखडा सादर केला. दि. २४ फेब्रुवारी पासून या प्रशिक्षण वर्गांना सुरुवात होणार आहे

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत अलिबाग जिल्हा कारागृहाचे अधीक्षक, अशोक कारकर यांनी बंद्यांना प्रशिक्षणामुळे होणाऱ्या फायद्यांवर प्रकाश टाकला. त्यांनी स्पष्ट केले की हे प्रशिक्षण केवळ एक कौशल्य संपादन करण्याचे साधन नसून, त्यातून बंद्यांना नवीन सुरुवात करण्याची संधी मिळेल.कार्यक्रमाची सांगता आभार मानुन केली.

### स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष उभारणीला गती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्तनदा मातांसाठी स्वतंत्र हिरकणी कक्षाची सुविधा असावी, या शासकीय धोरणाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ज्या शासकीय इमारतीत अद्याप हिरकणी कक्ष सुरू करण्यात आलेला नाही तेथे हिरकणी कक्ष तात्काळ स्थापन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या आहेत.

स्तनदा मातांसाठी स्वतंत्र खोली तिथं पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पलंग पंखा असावा, भिंतीवर स्तनपानाचे महत्त्व आणि शिशुपोषणाच्या शिफारशी इ.ची सचित्र माहिती असावी आदी शिफारशी होत्या.

पान १ वरुन

## पनवेल मनपाचा कोणतीही करवाढ नसलेला ३८७३ कोटींचा अर्थसंकल्प

**बांधकाम विभाग**

या अर्थसंकल्पात महापालिकेच्या प्रस्तावित बांधकाम विभागाच्या कामांमध्ये नवीन प्रशासकीय इमारत स्वराज्य १५८ कोटी रुपये, महापौर निवासस्थान व नवीन प्रभाग कार्यालये बांधकामासाठी ३८ कोटी रुपये, रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण व डांबरीकरण ४३७ कोटी रुपये, क्रिडांगणे ५७ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहे. खारघर येथे नगरवाचन मंदिर व नाट्यगृह व वाचनालय बांधणीकरिता १४ कोटींचा निधी ठेवण्यात आला आहे. याचबरोबर माता रमाबाई आंबेडकर भवन, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. पनवेल शहरात गाढी नदीलगत पूरप्रतिबंधक बंधारा बांधणे व पंपिंग स्टेशन उभारणीसाठी १७.५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. कळंबोली नोडमधील होल्डींग पॉड (धारण तलाव) येथील गाळ काढणे व इतर अनुषांगिक उपाययोजना करण्यासाठी ३५ कोटींची तरतूद केली गेली आहे.

**घनकचरा व आरोग्य**

पनवेल महापालिकेला स्वच्छ भारत मिशनमध्ये क्रमांक मिळविण्याच्या हेतूने चार प्रभागांसाठी मेगा स्विपिंग मशीन्ससाठी तरतूद करण्यात आली आहे तसेच धूळ नियंत्रणाकरिता विविध उपाययोजना करण्यासाठी ११.३८ कोटींचा निधी ठेवण्यात आला आहे.

**वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारणे व संचलित करणे**

पनवेल महापालिका सिडको प्राधिकरणासोबत कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती (वेस्ट टू एनर्जी प्रकल्प) या प्रकल्पामध्ये सहभागी होत आहे. यासाठी अर्थसंकल्पात १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. एकूणच घनकचरा संकलन, वाहतूक व मनुष्यबळ इ कामासाठी २२१ कोटींचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**शहरातील प्रमुख चौक, प्रवेशद्वार, कार्यालय सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे**

पनवेल महापालिका हद्दीमध्ये महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व व्यापक जनहितार्थ मुलभूत उपाययोजना करणे हे काम प्रगतिपथावर आहे. यासाठी अर्थसंकल्पात १०७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

# पेणच्या आमसभेत अधिकारी निरूत्तर

## ■ नागरी प्रश्नांचे आठवडाभरात निराकरण करण्याचे निर्देश

**पेण : प्रतिनिधी**

पाच वर्षांत न झालेली पेण तालुक्याची आमसभा मंगळवारी आगरी समाज सभागृहात आमदार रविशेठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व खासदार धैर्यशील पाटील यांचे उपस्थितीत झाली. चार तास चाललेल्या या आमसभेत आमदार खासदारांनी अधिकारी वर्गाला उत्तर न देता आल्याने आठवडाभरात नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी आदेश दिले असून आमसभेत नागरीक आक्रमक होत वातावरण चांगले तापल्याने सभा वादळी ठरली.



या आमसभेत पेण पंचायत समिती आयोजीत या आमसभेप्रसंगी प्रांत अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, जि.प.सदस्य डी.बी.पाटील, पेण मुख्याधिकारी जीवन पाटील गटविकास अधिकारी सोनल सूर्यवंशी, सहाय्यक गटविकास अधिकारी सविता कांबळे, नॅशनल हायवे, ग्रामीण पाणीपुरवठा, खारभूमी अधिकारी, महावितरण अधिकारी, पेण वनविभाग अधिकारी पेण पोलीस निरीक्षक, वडखळ पोलीस निरीक्षक, दादर पोलीस निरीक्षक, पेण नगर पालिका बांधकाम अधिकारी व इतर शासकीय विभागीय अधिकारी ग्रामसेवक, सरपंच, गावोगावचे नागरिकाची मोठ्या प्रमाणात उपस्थीती होती..

महत्वाचे प्रश्नामधे अ‍ॅड. अच्युत पाटील यांनी प्रस्तावित एमएमआरडीए प्रकल्प हा शेतकरी वर्गाला उध्वस्त करणारा प्रकल्प असून याबाबत आपली भूमिका प्रकल्पाला विरोध करावाच लागेल, याबाबत उचित समयी योग्य ती भूमिका शेतकरी घेईल त्यांच्या पाठीशी आपण सर्वांनी एकत्रित हा लढा द्यावा लागेल असे अध्यक्षांनी आणि धैर्यशील पाटील यांनी स्पष्ट केले. या बरोबर गेल पाइपलाइन, राष्ट्रीय महामार्ग रखडलेली कामे पेण गागोदे खिंडीत वनखात्याच्या अधिकारी वर्गाचा काम न करु देण्याचे धोरण याबाबत सुनील जाधव वरसई यांनी काम न झाल्यास आत्मदहनाचा इशारा दिल्याने खासदारांनी संबधीत वन अधिकारी यांना महिनाभरात या प्रश्नाची समस्या सोडविण्यासाठी धारेवर धरले आणि महामार्ग प्राधिकरण अधिकारी याना ही चांगले खडसावले.

## रायगड जिल्हा ग्रंथालय संघांचे अधिवेशन उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा ग्रंथालय संघांचे ५९वे अधिवेशन सार्वजनिक वाचनालय, शहाबाज येथे पार पडले. या अधिवेशनात विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.




सहाय्यक ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील, रायगडचे प्रभारी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, सरपंच डॉ. केतकी तरे, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोन्दार्डे, उपाध्यक्षा शैलाताई पाटील, कोकण विभागाचे कोषाध्यक्ष प्रकाश पाटील, शहाबाज ग्रंथालयाचे अध्यक्ष नितीन पाटील, माजी अध्यक्ष नागेश कुलकर्णी यांचे हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी जिल्हा संघातर्फे प्रकाश पाटील यांनी दिलेल्या ठेवीमधून देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट ग्रंथालयीन कर्मचारी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. अ वर्ग उत्कृष्ट ग्रंथालयीन कर्मचारी पुरस्कार स्वप्नाली माळी, करवा लायब्ररी, महाड व योगिता साखरे, लक्ष्मीकांत सार्वजनिक ग्रंथालय, कर्जत यांना विभागून देण्यात आला.तर क वर्ग ग्रंथालय उत्कृष्ठ ग्रंथालय कर्मचारी पुरस्कार प्रभाकर पाटील ग्रंथालय अलिबागच्या ज्योती म्हात्रे यांना देण्यात आला

.रायगड जिल्हा ग्रंथालय संघातर्फे शतकोत्तरी पार केलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांचा सन्मान चिन्ह देऊन गौरव केला.

## निर्यातक्षम आंबा बागांची मॅंगोनेट प्रणालीद्वारे नोंदणीचे आवाहन


**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

युरोपियन युनियन व इतर देशांना आंबा निर्यात करण्यासाठी अपेडाच्या मॅंगोनेट प्रणालीद्वारे निर्यातक्षम आंबा बागांची नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.सन २०२४-२५ या हंगामाकरिता रायगड जिल्ह्यात आजअखेर १५३० आंबा बागांची यशस्वी नोंदणी झाली आहे. नोंदणीसाठी मुदत दि.२८ फेब्रुवारी पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील उर्वरित आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी या मुदतीचा लाभ घेऊन त्वरित मॅंगनेट प्रणालीद्वारे नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रायगड यांनी केले आहे.

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे:अर्ज,७/१२ व ८अ उतारे,आधार कार्ड,बागेचा नकाशा.नोंदणी प्रक्रिया: संबंधित कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. क्षेत्राची तपासणी करून अहवाल (प्रपत्र ४-अ) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना सादर करावा. यानंतर २ ब प्रपत्राद्वारे नोंदणी प्रमाणपत्र दिले जाईल.

### दुखवटा

**गंगाबाई पाटील**



**मोहोपाडा** : सावळे येथील गंगाबाई पाटील यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी (दहावे) कराडे खुर्द येथे धार्मिक रितीरिवाजानुसार होणार असून, होम हवन राहत्या घरी सावळे गावी होणारं आहे.त्यांचे उत्तर कार्य (तेरावे) या गावी रविवार दिनांक २ मार्च रोजी होणार आहे.त दरम्यान कै.गंगाबाई पाटील यांचा दशक्रिया विधी (दहावे) कराडे खुर्द येथे धार्मिक रितीरिवाजानुसार होणार असून, होम हवन राहत्या घरी सावळे गावी होणारं आहे.त्यांचे उत्तर कार्य (तेरावे) या गावी रविवार दिनांक २/३/२०२५रोजी होणार आहे.

**वासंती गंभे**



**रेवदंडा** : कुणबी समाजौन्नती संघ रोहा-मुंबई शाखा अध्यक्ष शरद गंभे यांच्या आई वासंती वामन गंभे यांचे शनिवार दि. २२ रोजी नालासोपारा येथील रूग्णालयात अल्पशा आजाराने आजाराने निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी दि. ३ मार्च रोजी सोमनाथ मंदिर सारसोली येथे तर तेरावा विधी रहाते घरी खैराळे, ता. रोहा येथे दि. ६ मार्च रोजी संपन्न होणार आहे. त्याच्या पश्चात विवाहीत मुलगे शरद गंभे व अनिल गंभे, तसेच विवाहीत मुंली भारती,सरिता,तसेच पुतणे विवेक, हेमंत, जयेंद्र, वसंचन तसेच नातवंडे व नाती आहेत.

# काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांच्या वक्तव्याचा पनवेलमध्ये जाहीर निषेध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्या वक्तव्यावर नरेंद्राचार्य महाराजांचे शिष्य आणि अनुयायांनी पनवेल बस आगाराजवळ सोमवारी (दि.२४) सायंकाळी निषेध करीत आंदोलन केले.

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराजांविषयी वडेट्टीवारांच्या अवमानकारक वक्तव्यामुळे अनुयायांमध्ये संताप पसरला आहे. या वक्तव्याचा निषेध करीत संतप्त अनुयायांनी वडेट्टीवार यांनी तातडीने जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली. पनवेल बस आगारासमोरील चौकात झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने भक्तगण सहभागी झाले होते.




या वेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. अनेकांनी हातात पोस्टर आणि फलक घेत निषेध नोंदवला. संतांच्या बाबतीत अशी वक्तव्ये करणे अयोग्य असून लाखो भक्तांच्या भावना त्यामुळे दुखावतात, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले.

# वारदोलीच्या उपसरपंचपदी भाजपचे दिनेश पाटील बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वारदोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे दिनेश पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दिनेश पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

पनवेल तालुक्यातील वारदोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची निवडणुक मंगळवारी (दि.२५) झाली. या निवडणुकीत भाजपचे दिनेश पाटील यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली. निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला.

या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, वारदोली ग्रामपंचायतीचे सरपंच राम पदु भवर, हेमंत रघुनाथ तांडेल, जान्हवी जितेंद्र बताले, अर्पित अनंता पवार, सविता संतोष पाटील आदी उपस्थित होते.

## निवडक

### रेल्वेतून पैशाची बॅग लंपास

**पनवेल :** कामोठे येथे राहणारा धोंडू (५९) हे कुर्ला येथून रेल्वेने पनवेलला येत होते. त्यावेळी त्यांनी ४० हजारांची रोकड व कागदपत्रे असलेली बॅग रॅकवर ठेवली होती. दरम्यान, मानसरोवर स्थानकात ते उतरताना बॅग घ्यायचे विसरले असता अज्ञाताने ती चोरी करून नेली. याबाबत त्यांनी पनवेल रेल्वे पोलिसांकडे तक्रार केली असता गुन्हा दाखल केला असून, पोलीस तपास करत आहेत.

### कानपोली येथे तरुणाची आत्महत्या

**पनवेल :** कानपोली येथील ३२ वर्षीय तरुणाने नारपोली येथील शेतातील करंजाच्या झाडास साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली. विनायक विष्णू पोरजी असे या तरुणाचे नाव आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. विनायक पोरजी याने पुणे येथे जाणार असल्याचे सांगून शेतातील करंजाच्या झाडात साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याचे कारण मात्र समजू शकले नाही. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात रक्तदान शिबिर; स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त), राष्ट्रीय सेवा योजना विभाग (रायगड जिल्हा-झोन १) आणि एम.जी.एम. रुग्णालय, कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने सीकेटी महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाने भव्य रक्तदान शिबिर मंगळवारी (दि. २५) झाले.





शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते झाले. त्यानंतर रक्तदान शिबिरास सुरवात झाली, ज्यामध्ये रक्तदान करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, परीक्षा विभागाचे नियंत्रक प्रो. डॉ. एस. आय. उन्हाळे, व्यवसाय अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. ए. के. दीक्षित, डी. डी. विसपुते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी पाटील, विद्यानिकेतन महाविद्यालयाच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. हिना जैन तथा बार्न्स कॉलेजचे एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत मुकादम, प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

रक्तदान शिबिरात ६२ युनिट्स यशस्वीरीत्या संकलित केल्याबद्दल एमजीएम रुग्णालयाने एनएसएस युनिटचे प्रशंसापत्र देऊन कौतुक करण्यात आले. प्रस्तूत शिबिराच्या माध्यमातून रक्तदान हेच जीवनदान हा संदेश देण्यात आला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएस विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. एस.एन. परकाळे, वरिष्ठ महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, उपक्रम समन्वयक प्रा. आलोक भानुशाली, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. रुपाली पाटील, प्रा. पूजा दांदळे व कार्यक्रम अधिकारी प्रा. रूपेश माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सीकेटी विद्यालयात स्काऊट गाईड निसर्ग शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये मंगळवारी (दि.२५) स्काऊट गाईड निसर्ग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास गोविंदा सत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त समाजसेवा, स्वयंशिस्त, स्वावलंबन, श्रममूल्य व इतर मूल्यांची रूजवणूक करण्यात आली. तसेच पर्यावरण संवर्धन यासंबंधी वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी होंडागीत, प्रार्थना, नाटिका, स्फूर्तीगीत या कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास गोविंदा सत्रे सर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, स्काऊट गाईड एकसंघ राहण्याची शिकवण देत असून समाजात आदर्शवत काम करीत आहे. असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यस. त्यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, तनुजा मोरे मॅडम, हेमंत कोळी कार्यक्रमास उपस्थित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अतिशय आनंद झाला.

कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये विद्यालयाचे हरिश्चंद्र ठाकूर, ज्यांती पाटील, विलास यशसवंतराव, सुबोध दिवेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तनुजा मोरे, विद्या मावलीकर, स्वाती पाटील यांनी निसर्ग शिबिरास भेट दिली. या उपक्रमाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास गोविंदा सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे सर, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



# गगनगिरी महाराजांच्या पालखीचे पनवेलमध्ये स्वागत

**पनवेल : वार्ताहर**

परमपूज्य गगनगिरी महाराज यांच्या मुंबई ते खोपोली पायी पालखीचे पनवेलमध्ये परमपूज्य गगनगिरी महाराज पनवेल भक्त मंडळाने स्वागत करून शहरातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. या वेळी आमदार विक्रांत पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील यांनी पालखी सोहळ्यात उपस्थित राहून पालखीचे दर्शन घेतले.



महाशिवरात्रीनिमित्त मुंबई ते खोपोली गगनगिरी महाराज आश्रम येथे जाणारी पायी पालखी दरवर्षीप्रमाणे पनवेल शहरात आली होती.

या वेळी गगनगिरी महाराज पनवेल भक्त मंडळाच्या वतीने पालखीचे भव्य स्वागत गार्डन हॉटेल येथे करण्यात आले त्यानंतर पालखी पनवेल शहरातील श्री रामेश्वर मंदिरात आरतीचे व पायी पालखीतील भक्तांना अल्पोपहारची व्यवस्था करण्यात आली या नंतर पालखी खोपोलीच्या दिशेने रवाना झाली.

या पालखी सोहळ्यात गगनगिरी महाराज पनवेल भक्त मंडळाचे सदस्य तसेच महिला व भक्त गण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पालखी मार्गावर अनेक मंडळ व भक्तांनी पाणी, सरबताची सोय केली होती.

# होमगार्डवर चाकूहल्ला करणारा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेल्या रेल्वे रुळावर गस्त घालण्यासाठी गेलेल्या सुरज जनार्दन पाटील (वय ३५) या होमगार्डवर एका तरुणाने चाकूहल्ला करून पलायन केल्याची घटना घडली होती. पनवेल शहर पोलिसांनी चाकूहल्ला करणाऱ्या विशाल पवार (वय २७) या तरुणाचा शोध घेऊन त्याला तत्काळ अटक केली आहे.

दरम्यान, जखमी होमगार्डवर रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

कर्नाटक आणि कोकणातून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या मेल-एक्स्प्रेस गाडीचा वेग पनवेलमधील काळुंद्रे नदीजवळ कमी होतो. याचाच फायदा उचलत भुरटे चोर, लुटारू अंधारात या मेल-एक्स्प्रेस गाडीमध्ये घुसून प्रवाशांचे दागिने, मोबाईल फोन व किमती ऐवज लुटून पोबारा करतात. याच पार्श्वभूमीवर रेल्वे पोलिसांनी काळुंद्रे नदीजवळ रात्रीच्या वेळी गस्त वाढवली आहे. पनवेल रेल्वे स्थानकात कार्यरत असलेले होमगार्ड सुरज पाटील हे त्यांच्या सहकार्यासह काळुंद्रे नदीजवळच्या रुळालगत गस्त घालण्यासाठी गेले होते.

या वेळी त्या ठिकाणी आरोपी पवार व त्याचे दोन साथीदार रेल्वे रुळावर शेकोटी पेटवून बसले होते. या वेळी होमगार्ड पाटील यांनी त्या तिघांना हटकल्याच्या रागातून नशेत असलेल्या पवारने होमगार्ड पाटील यांच्या पाठीमध्ये चाकू खुपसून गंभीर जखमी केले. त्यानंतर विशाल आणि त्याचे दोघे साथीदार पळून गेले. पोलिसांनी शोधमोहीम राबवत आरोपी पवाराला अटक केली.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पनवेलमध्ये विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



मराठी भाषा गौरव दिन आणि कुसुमाग्रज जयंतीनिमित्त गुरुवारी (दि.२७) पनवेल महापालिकेच्या वतीने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'कुटुंब रंगलय काव्यात प्रा. विसूभाऊ बापट यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच पर्यावरणपूरक गणपती उत्सव स्पर्धेतील विजेत्या मंडळांना पारितोषिकाचे वितरणही करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी आमदार प्रशांत ठाकूर तसेच आमदार विक्रांत पाटील, मनपा आयुक्त मंगेश चितळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. हा कार्यक्रम आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी ११ वाजता सुरू होणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# पनवेलमध्ये प्रतिजैविक प्रतिकार जागरूकता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील रोजबाजार, भाजी मार्केटच्या स्वयंसहाय्यता महिला मंडळाच्या अध्यक्ष तथा माजी नगरसेविका दर्शना भोईर व खारघरमधील भारती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी प्रतिजैविक प्रतिकार जागरूकता मोहीम राबविण्यात आली.



आज जगभर प्रतिजैविक प्रतिकार हा गंभीर आरोग्य समस्या बनला आहे. यामुळे साधे संसर्गही धोकादायक ठरू शकतात, कारण प्रतिजैविके प्रभावी राहात नाहीत. या संकटावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि जागरूकता पसरवण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे.

प्रतिजैविकांच्या चुकीच्या वापराचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचवणे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय प्रतिजैविके घेणे का टाळावे हे समजावून सांगणे. संसर्ग टाळण्यासाठी योग्य स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपाय शिकवणे. समाजात जबाबदार औषध वापर आणि आरोग्याबद्दल जागरूकता वाढवणे. हा या मोहिमेचा उद्देश आहे.

या जागरुकतेमुळे आरोग्य सुधारणा होऊन योग्य प्रतिजैविक वापरामुळे संसर्ग टाळता येईल. लोकांमध्ये आरोग्यविषयक साक्षरता वाढेल. औषधांच्या अतिरेकामुळे होणारे परिणाम रोखता येतील.औषधांचा योग्य वापर तसेच संपूर्ण समाजाच्या आरोग्यास मदत - जबाबदारीने औषध वापरण्याची सवय असे अनेक फायदे आहेत.

पनवेल शहरातील रोजबाजारमध्ये झालेल्या या मोहिमेवेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, साहेबराव घुमरे, मंदा राऊत व भारती विद्यापीठातील विद्यार्थी उपस्थित होते.

# कोकण विभागीय पत्रकार अधिवेशन शुक्रवारी पनवेलमध्ये

**उरण : बातमीदार**

संपूर्ण कोकण क्षेत्रातील मुंबई, ठाणे, पालघर, नवीमुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथील पत्रकारांसाठी वर्षातून किमान एकदा तरी एकत्र येऊन आपल्या विचारांची देवाणघेवाण व्हावी या उद्देशाने पत्रकार सुरक्षा समिती रायगड नवी मुंबईच्या वतीने कोकण विभागीय पत्रकार अधिवेशन २०२५चे आयोजन शुक्रवारी (दि.२८) पनवेल तालुक्यातील धामणी येथील जोशी फार्म येथे आयोजित कारण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक नेत्र विशारद पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, मुंबई मराठी पत्रकार संघांचे अध्यक्ष संदीप चव्हाण, दैनिक पुण्यनगरीचे संपादक शैलेंद्र शिर्के, दैनिक लोकसत्ताचे सहाय्यक संपादक विकास महाडिक आणि पत्रकार सुरक्षा समितीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत पवार यांची उपस्थिती लाभणार आहे.

पहिजेत

**संपर्क अधिकारी (लायजन ऑफीसर)**

मॅपलट्री प्रॉपर्टी प्रायव्हेट लिमीटेड हे ४० वर्षांहून अधिक काळापासुन मुंबईतील एक नामांकित व प्रतिष्ठित विकासक असुन नवी मुंबईमध्ये मोठे प्रकल्प राबवत आहोत. कंपनीस त्यांचे प्रकल्पा संबंधित नवी मुंबई येथील विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक प्राधिकरण आणि नियामक प्राधिकरण (सिडको, नैना, महसूल विभाग इ.) येथे कंपनीचे प्रलंबित कामकाज, संवाद सुलभ करण्यासाठी आणि कंपनीमार्फत व्यवस्थापन करण्यासाठी अनुभवी संपर्क अधिकारी **( लायजन ऑफीसर)** हवा आहे. पात्रताधारक उमेदवारास शेतजमिनीशी निगडित कागदपत्रे, विकासकाम कार्यपध्दती व विविध परवानग्या प्राप्त करणे, महसुल विभागाशी संबंधित कामाचा अनुभव असणे आणि अनुपालन याबाबत सखोल अनुभव व ज्ञान आवश्यक आहे.

पात्र इच्छुक उमेदवारानी त्यांचे पुर्व अनुभव तपशिलासह आवेदन अर्ज (सिव्हि) आवश्यक कागदपत्र **hr@mapletreeproperty.com** वर ईमेल करावा.

**मॅपलेट्री प्रॉपर्टी प्रायव्हेट लिमिटेड**

तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४० ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेल समोर, केम्प्स कॉर्नर, ग्रँट रोड (पश्चिम), मुंबई-४०००२६.
दूरध्वनी: ९१५२९२५३१० / २३८३५५५५

## संपादकीय

# चौकशी व्हायलाच हवी

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेकडून भारताला देण्यात आलेल्या 'युएसएड' संदर्भात केलेल्या वक्तव्यांमुळे या मदतीभोवती संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही रक्कम नेमकी कोणाला आणि कोणत्या हेतूने दिली गेली याची चौकशी खरेच झाली पाहिजे.

**'यूएसएड' अंतर्गत दिल्या गेलेल्या पैशांचा विषय अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काढला तो अमेरिकी करदात्यांच्या हिताच्या दृष्टीने. भारतातील मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी एवढी रक्कम का दिली असा प्रश्न ट्रम्प यांनी अमेरिकेचे या आधीचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांच्या प्रशासनाला केला. सोबतच, नरेंद्र मोदी यांच्याऐवजी बायडन प्रशासनाला दुसऱ्या कुणातरी व्यक्तीला सत्तेवर आणायचे होते असे वक्तव्यही ट्रम्प यांनी केल्यामुळे याभोवती स्वाभाविकच संशयाचे वातावरण भारतात निर्माण झाले आहे. यापूर्वीही अनेकदा आपल्याकडे देशातील लोकसभा निवडणुकांमध्ये परकीय शक्तींकडून हस्तक्षेप होत असल्याची चर्चा झाली आहे. बायडन यांच्या राजवटीशी जवळीक असलेल्या जॉर्ज सोरोस आणि त्यांच्या 'ओपन सोसायटी फाऊंडेशन'ने काँग्रेस पक्षाला केलेल्या मदतीविषयीचे प्रकरण संसदेतही गाजले आहे. सोनिया गांधी यांच्या 'फोरम ऑफ डेमोक्रेटिक लीडरशिप इन द एशिया पॅसिफिक' या संघटनेला तसेच 'राजीव गांधी फाऊंडेशन'लाही सोरोस यांच्याशी संबंधित संस्थांनी निधी दिल्याचे आरोप झाले आहेत. या चर्चेला आता ट्रम्प यांच्या ताज्या विधानांमुळे पुष्टी मिळते आहे का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. यूएसएडची स्थापना करण्यामागे, जगभर लोकशाहीचे संवर्धन व्हावे, समृद्धी निर्माण करण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण व्हावे, आणि त्याचा उपयोग अमेरिकेला तसेच जागतिक समुदायालाही व्हावा आदी उदात्त हेतू असल्याचे सांगितले जाते. वरकरणी याच उदात्त हेतूंनी युएसएडकडून अब्जावधींचा निधी जगभरातील देशांना दिला जातो. परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, हे सर्वज्ञात आहे. अमेरिका स्वत:चे हितसंबंध जपण्यासाठी जगभरातील देशांमध्ये हस्तक्षेप करते हेही साऱ्या जगाला ठाऊक आहे. त्यामुळे त्यादृष्टीनेच युएसएडच्या मदतीबाबत ट्रम्प यांनी केलेल्या वक्तव्यांचा विचार व्हायला हवा. काँग्रेसी राजवटीच्या काळात प्रचंड प्रमाणात मिळणाऱ्या या निधीचे स्रोत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर येताच मात्र बरेच आटले. मात्र त्याचवेळी धर्मांतरणाशी संबंधित काही स्वयंसेवी संस्थांना मिळणारा निधी तेवढा वाढला. त्यामुळेच आता त्या निधीबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ही रक्कम खरोखरच भारतातील लोकशाही मजबूत करण्यासाठी होती की लोकशाही मार्गांनी निवडून आलेल्या मोदी सरकारविरोधात आंदोलनांना बळ देण्यासाठी या निधीचा वापर केला गेला? याच पैशाच्या मदतीने सरकारविरोधी फेक नरेटिव्ह तर पोसले गेले नाही ना, असे अनेक प्रश्न आता विचारले जात आहेत. भारतीय जनता पक्षाने या साऱ्याची चौकशी करण्याची मागणी करताच काँग्रेस पक्षानेही साळसुदपणाचा आव आणत यासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली आहे. युएसएडचा पैसा भारताला नव्हे तर बांगलादेशच्या निवडणुकांसाठी देण्यात आला होता असा एक अहवालही ट्रम्प यांच्या वक्तव्यांपाठोपाठ अमेरिकेत प्रकाशित झाला. काही काळापूर्वी बांगला देशात शेख हसीना यांच्याविरोधात उठाव होऊन नंतर महम्मद युनूस यांच्याकडे सूत्रे सोपवण्यात आली. या घडामोडींमध्ये अमेरिकेचा हात असल्याची चर्चाही झाली आहे. विकसनशील देशांच्या आर्थिक हतबलतेचा फायदा बडी राष्ट्रे घेतात. त्यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थेच्या देशाने आपल्या स्वायत्ततेबाबत जागरूक राहायलाच हवे आहे.**





# दक्षिण काशी अर्थात श्रीवर्धनमधील श्रीक्षेत्र हरिहरेश्वर

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर तीर्थ क्षेत्र दक्षिण काशी हरिहरेश्वर: महाराष्ट्रातील पवित्र व आकर्षक धार्मिक ठिकाण रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात वसलेले हरिहरेश्वर हे एक अत्यंत पवित्र तीर्थ क्षेत्र आहे, जे दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध आहे. समृद्ध निसर्ग, ऐतिहासिक महत्त्व आणि धार्मिक ठिकाणे यांचा संगम असलेले हे ठिकाण हरिहरेश्वर मंदिराच्या आकर्षणामुळे पर्यटकांना एक अद्वितीय अनुभव प्रदान करते. महाशिवरात्रीच्या सणाच्या दिवशी येथे प्रचंड गर्दी जमते, कारण भक्तांचे हे श्रद्धास्थान आहे.

यात्रेच्या पार्श्वभूमीवर, हरिहरेश्वर क्षेत्राची एक महत्त्वाची आख्यायिका आहे. फार पूर्वी ब्रह्मा विश्वपती यांचे नेतृत्व असताना, त्याने विष्णू आणि शंकर यांच्यासोबत एक महायाग आयोजित करण्याचे ठरवले. यज्ञाची तयारी सुरू झाली होती, पण ब्रह्मदेवाची पत्नी सावित्री तेथे हजर राहिली नाही. यज्ञाच्या शुद्धतेसाठी देवांद्वारे शाप दिला गेला आणि सर्व देवते शापमुक्त होऊन त्यांना यज्ञ पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मिळाला. यज्ञाच्या दिवशी शंकर कालभैरव रूपाने येथे प्रकट झाले.

हरिहरेश्वर मंदिराच्या परिसरातील विविध तीर्थस्थळे भक्तांना एक अद्वितीय आध्यात्मिक अनुभव देतात.ब्रह्मा पॉईंट, विष्णू पॉईंट, गौतम तीर्थ, पांडव तीर्थ, महाशिव तीर्थ अशा स्थळांवर भक्त परिक्रमा करून शांती मिळवतात. हरिहरेश्वर मंदिराच्या पायऱ्यांवर चढताना आणि परिसरातील नयनरम्य समुद्र, पर्वत आणि आकाश यांचा अनुभव घेताना मनावर एक अद्वितीय सकारात्मक प्रभाव पडतो.





महाशिवरात्रीच्या दिवशी हरिहरेश्वर क्षेत्रात विशेष महात्म्य असतो. या दिवशी मंदिरात विशेष पूजा, अभिषेक आणि महाप्रसाद आयोजित केला जातो. स्थानिक भक्त आणि पर्यटक मोठ्या संख्येने इथे दर्शनासाठी येतात. यावेळी पवित्र वातावरणात भक्त शंकराची पूजा अर्चा करून आत्मिक शांती प्राप्त करतात. महाशिवरात्रीच्या दिवशी व्रत करणारे भाविक खास यथेच्छ आनंद घेतात आणि हरिहरेश्वर क्षेत्राच्या पवित्रतेचा अनुभव घेतात.

काळेश्री देवी मंदिर, साक्षभैरव मंदिर, आणि अगस्तीगुहासारखी ऐतिहासिक स्थळे येथे भेटीला जातात. हरिहरेश्वर क्षेत्रात भक्तांसाठी त्रिलिंग रूप असलेल्या मुख्य देवतेचा पूजन केला जातो. येथील मंदिरे, विशेषत: शंकर आणि पार्वती यांच्या पूजा, भक्तीच्या विविध पद्धती आणि तिथे असलेल्या अत्यंत शांतिकारक वातावरणामुळे धार्मिक महत्त्वपूर्ण ठिकाण आहे.

हरिहरेश्वर मंदिराच्या परिसरातील अनेक पर्यटक आकर्षणे आहेत. हिम्मतगड किल्ला, श्रीवर्धन येथिल सोमजाई मंदिर, कुसुम मंदिर अशा ऐतिहासिक स्थळांचा शोध घेत, पर्यटक निसर्गाच्या सौंदर्याचा अनुभव घेत जातात. याशिवाय, येथील समुद्रकिनारा व शांत वातावरण प्रवासाच्या सुखानुभवात भर घालतात.

हरिहरेश्वर हे एक अद्वितीय धार्मिक स्थल आहे, जे प्रत्येक भक्ताला नवा अनुभव आणि आंतरिक शांती प्रदान करते. स्थानिक आणि बाह्य पर्यटक एकत्र येऊन इथे आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी स्थानिक देवते आणि निसर्गाचे दर्शन घेतात. विविध ठिकाणांचे दर्शन आणि तीर्थस्थळांवरच्या दर्शनाने भक्त आपल्या जीवनाच्या प्रवासात नवीन उर्जा व शांती मिळवू शकतात.

हरिहरेश्वर म्हणजे एक अशी गंतव्यस्थळे आहे, जिथे भक्त विविध धार्मिक कार्यांमध्ये भाग घेऊन आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शन घेतात.

श्री हरिहरेश्वर क्षेत्र धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. येथे ब्रह्मा, विष्णू, महेश आणि पार्वती यांची उपस्थिती असून, श्री कालभैरवाच्या पश्चिमद्वाराजवळ महाबळ दैत्याने देवतेचा पराभव केला. त्याच्या देहावर देवते विराजमान झाल्यावर या स्थानाचे महत्त्व वाढले. सावित्री आणि कृष्णा या नद्यांच्या उगमाशी संबंधित एक महत्त्वाची कथा आहे, ज्यामध्ये सावित्रीने देवांना जलरूप होण्याचा शाप दिला. कृष्णाने तिला शांत करण्यासाठी हरिहर पर्वताची निर्मिती केली. यज्ञाच्या आयोजनामुळे या ठिकाणाचे धार्मिक महत्त्व वाढले, आणि ते दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. येथे श्री कालभैरव आणि हरीहरेश्वर यांच्या पूजेने भक्तांना आध्यात्मिक शांती मिळते. हे स्थान आजही भक्तांसाठी एक पवित्र तीर्थस्थान आहे.

हरिहरेश्वरच्या आसपास अनेक सुंदर आणि ऐतिहासिक ठिकाणे आहेत जिथे तुम्ही नक्कीच भेट देऊ शकता. हरिहरेश्वर समुद्रकिनारा आणि कोंडिवली बीच येथे शांतता आणि निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेता येतो. कालभैरव मंदिर आणि शंकर मंदिर येथे धार्मिक वातावरण आहे. वेलास बीच आणि श्रीवर्धन समुद्रकिनारा शांत समुद्र किनाऱ्यांमुळे प्रसिद्ध आहेत. बाणकोट किल्ला, गणेश गल्ली, आणि भागमंडळा हे ऐतिहासिक ठिकाणे देखील अनोखे अनुभव देतात. सोमजा देवी मंदिर, घुश्मेश्वर आणि दिवेआगर बीच हे अतिरिक्त मनोरंजनाचे ठिकाणे आहेत.

**–भरत चोगले, श्रीवर्धन**



## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळा सुरू होण्यापूर्वी बाईकची काळजी घ्या

भारतात उन्हाळा खूप कडक असतो आणि तुम्हाला तुमची बाईक सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. तुम्ही तुमची बाईक दररोज वापरत असाल किंवा कमी वापरत असाल, उन्हाळ्यात जर तुम्ही तिची काळजी घेतली नाही तर तुम्हाला देखभालीच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल.



नियमित बिघाड होण्यापासून ते जास्त इंधन वापरण्यापर्यंत तुम्हाला अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागेल. यासाठी नक्की काय काय करायला हवं हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

टायर्स हे तुमच्या बाईकचा सर्वात महत्त्वाचा घटक आहेत. टायर्स तुमच्या गाडीला पुढे घेऊन जातात, संतुलन देतात आणि तुमचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी काम करतात. म्हणूनच तुम्हाला बाईकच्या टायर्सच्या स्थितीकडे जास्त आणि खूप बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. टायरवरील धागे लवकर झिजू नये याची काळजी घ्या, गाडीला योग्य आधार देण्यासाठी हे धागे खूप महत्त्वाचे आहेत. जर ट्रेड्स जीर्ण झाले तर टायर्स घसरू शकतात आणि त्यामुळे गंभीर अपघात होऊ शकतात, म्हणूनच तुम्ही नियमितपणे टायर्स तपासले पाहिजेत.

पेट्रोलपासून ब्रेक ऑइलपर्यंत आणि इंजिन ऑइलपर्यंत, गाडी चांगली चालावी म्हणून तुम्हाला इंधन भरावे लागते. जर तेलांमध्ये समस्या असेल तर तुम्हाला समस्या उद्भवू शकते. ब्रेक ऑइल, इंजिन ऑइल इ. उन्हाळ्यात तुमची बाईक सुरळीत चालत राहण्यासाठी, नियमितपणे आवश्यक द्रवपदार्थ तपासा. हे एक महत्त्वाचे काम आहे आणि तुम्ही ते वगळू नये.

संपूर्ण टाकी भरणे टाळा

विशेषत: उन्हाळ्याच्या दिवसात तेल उष्णतेमुळे पसरते. जेव्हा तुम्ही इंधन टाकी पूर्णपणे भरता तेव्हा इंधन पसरण्यासाठी जागा राहत नाही. जेव्हा तुम्ही बाईक सुरू करता आणि ती काही काळ चालते तेव्हा इंजिन आणि इतर घटक आतून गरम होतात. हवामानामुळे बाहेरून येणारी उष्णतादेखील बाईकच्या तापमानात योगदान देते, यामुळे तेल बाहेर सांडते. सर्व गळती खूप धोकादायक असू शकतात आणि त्यामुळे तुमच्या बाईकमध्ये बिघाड होऊ शकतो.

टायर्स तपासणे आणि इंधनाची आवश्यकता राखणे यासारख्या काही पद्धतींचे पालन करणे खूप महत्त्वाचे आहे, परंतु बाईक विमा योजना घेणे खूप महत्वाचे आहे. तुमच्या प्रयत्नांनंतरही तुमच्या बाईकला काही समस्या येऊ शकतात, म्हणूनच तुम्ही एक चांगली बाईक विमा योजना घ्या

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

विनायक दामोदर सावरकर यांचे जीवन हे भारताच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक मुक्तीसाठी केलेल्या प्रतिकार, संघर्ष, संघर्ष, दुःख आणि त्यागाची कहाणी आहे. त्यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिकजवळील भगूर या गावी चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला.

सावरकरांनी नाशिकमधून मॅट्रिक केले आणि पुण्याला गेले आणि तेथे ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये दाखल झाले. तिथे त्यांनी विद्यार्थ्यांचा एक गट तयार केला, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी एकनिष्ठ जीवनशैलीची शपथ घेतली. १९०४ मध्ये, पदवीधर असलेल्या सावरकरांनी त्यांच्या २०० विश्वासू साथीदारांची बैठक बोलावली आणि अभिनव भारतची स्थापना केली ही संघटना शस्त्रांच्या वापराने आवश्यक असल्यास ब्रिटिश शासकांपासून स्वातंत्र्य हिसकावून घेण्यासाठी समर्पित होती. १९०५ मध्ये पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी मुंबईत कायद्याचे शिक्षण घेतले. पुढच्या वर्षी, सावरकर लोकमान्य टिळकांच्या शिफारशीवरून शिष्यवृत्तीवर कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लंडनला गेले कालांतराने त्यांना ग्रेज इनमध्ये प्रवेश मिळाला. लवकरच, तरुण क्रांतिकारकाने त्यांच्या गुप्त संघटनेसाठी, अभिनव भारत साठी भरतीचे ठिकाण म्हणून लंडनमध्ये



### निमित्त

फ्री इंडिया सोसायटी सुरू केली आणि मॅडम कामा यांच्यासह अनेक भारतीयांना नोंदणीकृत केले.

१ जुलै १९०९ रोजी, मदनलाल धिंग्रा यांनी इम्पीरियल इन्स्टिट्यूटच्या हॉलमध्ये कर्झन वायलीची गोळ्या घालून हत्या केली. या घटनेने लंडन हादरले आणि सावरकर संशयाच्या भोवऱ्यात सापडले. परिणामी, सावरकरांना पदवी देण्यास नकार दिला,

लंडनमध्ये,सावरकरांनी १८५७ च्या क्रांतीबद्दल स्वातंत्र्याचे पहिले युद्ध नावाचे एक पुस्तक लिहिले. हे पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वीच सरकारने ते जप्त केले. नंतर, १९१० मध्ये नाशिक कटाच्या प्रकरणात वीर सावरकरांना लंडनमध्ये अटक करण्यात आली. जेव्हा त्यांना मार्सेल्सजवळ खटल्यासाठी जहाजाने भारतात नेले जात होते, तेव्हा सावरकरांनी समुद्रात उडी मारली आणि जहाजातून झालेल्या गोळीबाराचा सामना करत पोहत फ्रेंच किनाऱ्यावर पोहोचले. मार्सेल्स येथे ब्रिटिश पोलिसांनी त्यांना अटक केली. फ्रेंच सरकारने फ्रेंच भूमीवरील या अटकेचा निषेध हेग आंतरराष्ट्रीय न्यायालयात केला. यामुळे वीर सावरकर आणि इतर भारतीय स्वातंत्र्यसैनिक जगभरात प्रसिद्ध झाले.

१९१० मध्ये सावरकरांवर मुंबई येथे राजद्रोहाचा खटला चालवण्यात आला आणि त्यांना जन्मठेपेची दुप्पट शिक्षा सुनावण्यात आली, एकूण ५० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना अंदमानातील सेल्युलर तुरुंगात ठेवण्यात आले होते जिथे त्यांनी १२ वर्षे सक्तमजुरी केली. १९२४ मध्ये वीर सावरकरांना रत्नागिरी येथे आणण्यात आले आणि १९३७ पर्यंत त्यांना तिथेच ठेवण्यात आले. १९३७ मध्ये त्यांची सुटका झाल्यानंतर ते हिंदू महासभेत सामील झाले. सात वर्षे ते हिंदु महासभेचे अध्यक्ष होते २६ फेब्रुवारी १९६६ रोजी वीर सावरकर यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. त्यांची स्मृती त्यांच्या देशवासीयांच्या हृदयात नेहमीच तेवत राहील.

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# आठवड्यातून दोन वेळा भेंडी खाण्याचे फायदे



भेंडीची भाजी ही आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गुणकारी आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी या भाजीचा आहारात समावेश केल्याने अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात.

एखाद्याला मधुमेह असेल तर रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी आणि इन्सुलिन संवेदनशीलता कमी करण्यासाठी भेंडी ही सर्वोत्तम भाजी आहे. भेंडीमध्ये क्वेरसेटिन ग्लुकोसाइड्स नावाचे फायटोन्यूट्रिएंट्स असतात, जे वैज्ञानिक भाषेत रक्तातील साखरेची पातळी, इन्सुलिनची पातळी आणि एकूण चयापचय आरोग्य कमी करण्यास मदत करतात.

भेंडी हे एक पौष्टिक पॉवरहाऊस आहे, जे आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजांनी परिपूर्ण आहे. हे व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के आणि फोलेटचे समृद्ध स्त्रोत आहे, जे संपूर्ण आरोग्य राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

भेंडीच्या उत्कृष्ट वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे त्यातील फायबर हे पचनास मदत करते, बद्धकोष्ठता प्रतिबंधित करते आणि पोट भरल्यासारखे वाटते, ज्यामुळे जे वजन नियंत्रित ठेवण्यास प्रयत्न करत आहेत, अशांसाठी एक उत्कृष्ट पर्याय आहे. भेंडीचे अँटीऑक्सिडेंट गुणधर्म एलडीएल कोलेस्ट्रॉलचे ऑक्सिडेशन रोखून हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतात. यात पोटॅशियमदेखील आहे, जे निरोगी रक्तदाब पातळीला समर्थन देते.

भेंडी आतड्याच्या जीवाणूंच्या वाढीचे पालनपोषण करून निरोगी आतड्याला प्रोत्साहन देते. योग्य पचन आणि एकूणच कल्याणसाठी संतुलित आतड्याचे मायक्रोबायोम महत्त्वपूर्ण आहे.डोळ्यांसाठी फायदेशीर

भेंडीमध्ये व्हिटॅमिन ए असते, जे निरोगी दृष्टी राखण्यासाठी आवश्यक आहे. नियमित वापराने डोळ्यांशी संबंधित समस्यांपासून संरक्षण करण्यास आणि चांगली दृष्टी राखण्यास मदत करू शकते.

भेंडीतील जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडेंट त्वचेच्या आरोग्यास चांगले योगदान देतात. ऑक्सिडेटिव्ह ताणतणाव कमी करण्यास त्वचेचा टोन सुधारण्यासाठी मदत करतात.

# बेणसे सिद्धार्थ नगरला आगीचा विळखा

## गावकरी भयभीत ▌ ग्रामस्थ व फायर ब्रिगेडच्या मदतीने अनर्थ टळला

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या पेण तालुक्यातील बेणसे सिध्दार्थ नगर गावाच्या लगत दि.(२५) मंगळवारी दुपारी अचानक आगीने पेट घेतला. बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केले. गावाला अग्नी तांडवाने घेराव घातल्याने गावकरी भयभीत झाले. आग नियंत्रणाबाहेर गेल्याने तातडीने रिलायन्स कंपनी कडून अग्निशमन बंब बोलविण्यात आले. यावेळी आलेल्या फायर ब्रिगेडच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण आणण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला

मंगळवारी दुपारी अचानक आगीने पेट घेतला. बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केल्यावर समय सुचकता राखत ग्रामस्थ व तरुणांनी उपलब्ध पाण्याने आग विझवण्यासाठी प्रयत्न केला. मात्र कडाक्याचे उन्हात सुकलेल्या पालापाचोळाने पेट घेतला. आणि आगीच्या ज्वाळा भडकल्या.



गावालगत पसरलेल्या आगीने गावकरी भयभीत झाले,आरडा ओरडा करू लागले.

आग नियंत्रणाबाहेर गेल्याने तातडीने रिलायन्स कंपनी कडून अग्निशमन बंब बोलविण्यात आले. यावेळी आलेल्या फायर ब्रिगेडच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण आणण्यात आले. दरम्यान, रिलायन्स व्यवस्थापनाचे वरिष्ठ अधिकारी अविनाश श्रीखंडे, गौतम मुखर्जी, नागोठणे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांना मोबाईलवर संपर्क करून घटनेची माहिती दिल्याने त्यांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन बंब घटनास्थळी पाठवून महत्वपूर्ण सहकार्य केले.

या आगीच्या घटनेत ग्रामस्थ, संघर्ष समितीचे पदाधिकारी व फायर ब्रिगेडचे अधिकारी तांबे, कर्मचारी तुकाराम वाळंज, परशुराम भोईर व टीमची मदत मिळाली, त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अस्पष्ट आहे.

आपत्ती काळात फायर ब्रिगेड वाहन व रुग्णवाहिका येण्या जाण्यासाठी मार्ग उपलब्ध नसल्याने अशातच रिलायन्सच्या नव्या प्रकल्पाची संरक्षण भिंत झाल्यास आजच्या सारखी आग अथवा सिलेंडर स्फोटाची घटना घडल्यास फायर ब्रिगेडचे वाहन गावात कुठून येणार? तातडीचे मदतकार्य कसे केले जाईल याचा रायगड जिल्हाधिकारी व आपत्ती व्यवस्थापन, रिलायन्स व्यवस्थापन यांनी विचार करावा अशी मागणी बेणसे झोतीरपाडा स्थानिक प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे पदाधिकारी व स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.

### ...अन्यथा गाव जळून खाक झाले असते!

बेणसे झोतीरपाडा ग्रामपंचायत हद्दीलगत व बेणसे बौद्धवाडीला लागून रिलायन्स प्रकल्प उभारताना गावालगत ३० फुटी संरक्षण भिंत उभारण्यात येत आहे. या कामाला स्थानिक संघर्ष समितीने विरोध दर्शविला आहे. सद्यस्थितीत हे काम थांबवले नसते व इथं भिंत उभी राहिली असती तर या दुर्घटनेत अग्निशमन बंब गावापर्यंत तातडीने येणे कठीण झाले असते. सदर वाहन हे सी टाइप वसाहत येथून मार्ग काढून आणण्यात आले. या वाहनाला येण्यास मार्ग मिळाला नसता तर संपूर्ण बेणसे सिध्दार्थ नगर गाव जळून खाक झाले असते

# रसायनीतील चोरट्याच्या मुसक्या आवळल्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



रसायनी जाताडे येथील श्रीकांत हरिभाऊ कुरुंगळे (वय ३६) याच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून १,९०,००० रुपये किमतीचे ५ तोळे ७ ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र(गंठण) जप्त केले आहेत.

श्रीकांत कुरुंगळे यास ऑनलाईन जुगाराचा छंद होता. तसेच लोकांकडून उसणे पैसे घेऊन तो कर्जबाजारी झाला होता. त्यामुळेच त्याने चोरी केल्याचे पोलीस तपासात स्पष्ट कबुली दिली आहे.

या प्रकरणी रसायनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस सब इन्स्पेक्टर लिंगप्पा सरगर, सहा.फौजदार राजेश पाटील, संदीप पाटील, पोलीस यशवंत झेमसे, सुधीर मोरे, रवींद्र मुंडे, प्रतिक सावंत, राकेश म्हात्रे यांनी कारवाई केली.


## दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल - ४१० २०६, जि. रायगड
ईमेल आयडी - panvel_urban65@rediffmail.com /panvelurban0065@gmail.com
शाखाः 'औदुंबर' प्लॉट क्र. १, रस्ता क्र. १५, सेक्टर १९, न्यू पनवेल पोस्ट ऑफीसजवळ, न्यू पनवेल, दूर.: २७४५३९६३

परिशिष्ट IV

**ताबा सूचना**

[नियम-८(१)]

(स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार यांनी, **दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि.**, चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (५४/२००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (अमंलबजावणी) नियमन २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून **दि. १९.०३.२०२४** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार **सौ. कमला गुरुनाथ पाटील, श्री. दीपक गुरुनाथ पाटील, श्री. लहू विठ्ठल पाटील, श्री. विक्रम जोमेश ठाकूर आणि श्री. ओमकार गुरुनाथ पाटील** यांच्याकडे सूचनेमध्ये उल्लेख केलेली **दि. २९.०२.२०२४ रोजीनुसारची** रक्कम **रु. ४९,६०,२८०/- (रुपये एकोणपन्नास लाख साठ हजार दोनशे ऐंशी मात्र)** व **दि. ०१.०५.२०२४** पासून संपूर्ण परताव्यापर्यंतचे पुढील व्याज परतावा करण्याची मागणी केली होती.

कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार रकमेचा परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचना देण्यात येते की, याखाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा निम्नस्वाक्षरीकार यांनी सदर नियमन, २००२ च्या नियम ८ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **२२ फेब्रुवारी, २०२५** रोजी **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषतः कर्जदार/गहाणवटदार/जामीनदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा **दि पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., कापड बाजार शाखे**च्या रक्कम **रु. ४९,६०,२८०/- (रुपये एकोणपन्नास लाख साठ हजार दोनशे ऐंशी मात्र)** आणि त्यावरील व्याजाच्या प्रभारास अधीन असेल.

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार / जामीनदार / गहाणवटदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

श्री. लहू विठ्ठल पाटील आणि श्री. दीपक गुरुनाथ पाटील यांच्या नावे असलेली सदनिका क्र. ००१, तळमजला, बी-विंग, लोटस सीएचएस, प्लॉट क्र. ४१, सेक्टर १ई, कळंबोली क्षेत्रफळ ५६.४ चौ.मी., मु. सेक्टर १ई, कळंबोली, ता.-पनवेल, जि.-रायगड.

**ठिकाणः कळंबोली**
**दिनांकः २६.०२.२०२५**

सही/-
प्राधिकृत अधिकारी
दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.


# चौकच्या लोकमान्य टिळक वाचनालयाचा सन्मान

**खोपोली : प्रतिनिधी**

सरनौबत नेताजी पालकर यांचे हे जन्म गाव असलेल्या चौक मध्ये लोकमान्य टिळक मोफत वाचनालयाल आहे नुकतेच १९वे वार्षिक ग्रंथालय अधिवेशन,शहाबाज येथे आयोजित करण्यात आले होते.यावेळी शंभर वर्ष पुर्ण झालेल्या या वाचनालयास सन्मानचिन्ह,सन्मानपत्र संस्थेचे सचिव सतिष आंबवणे व ग्रंथपाल अभिजीत चौधरी यांस देवून गौरविण्यात आले.

रायगड जिल्हामध्ये एकुण ६२ सार्वजनिक शासनमान्य ग्रंथालये आहेत.त्यातील ११ ग्रंथालयांनी शताब्दी पुर्ण केली असून या अधिवेशनांच्या



निमित्ताने शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत चौकच्या लोकमान्य टिळक मोफत वाचनालयाला १०५ वर्षे झाली असून अध्यक्ष सुरेश वत्सराज यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय आज ही सुरळीतपणे सुरु आहे

यावेळी सहाय्यक ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील,जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार उपस्थित होते.

# डेटा डिजिटायझेशनसाठी माजी सैनिकांना नोंदणी बंधनकारक

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या तर्फे सर्व माजी सैनिकांचा डाटा डिजिटायझेशन/संगणकीकरण करण्याचे काम सुरू आहे. यासाठी रायगड जिल्ह्यातील सेवा निवृत्त अधिकारी, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, युद्ध विधवा, वीर पत्नी, वीर माता, वीर पिता आणि अवलंबित यांनी १ मार्च २०२५ पूर्वी आपल्या नोंदी करणे अत्यावश्यक आहे.

नोंदणीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड,पॅन कार्ड,सैन्यसेवा पुस्तकाची छायांकित प्रत,माजी सैनिक ओळखपत्र, पासपोर्ट साईझ फोटो,इसीएचएस कार्ड,बँक पासबुक छायांकित प्रत.नोंदणी केल्यानंतर संबंधित कागदपत्रांसह फॉर्म लवकरात लवकर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड-अलिबाग येथे जमा करावा.

निर्धारित वेळेत नोंदणी न केल्यास जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या माध्यमातून मिळणाऱ्या कल्याणकारी आर्थिक मदत व इतर सेवा मिळणार नाहीत,यासाठी माजी सैनिकांना लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे

# अलिबाग कारागृहातील बंदीवानांसाठी आता ॲलन फोन सुविधा

## आठवड्यातून तीन वेळा मिळणार १० मिनिटे कुटुंबियांशी बोलण्याची संधी



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमधील जिल्हा कारागृह मागील काही वर्षात हायटेक होत आहे. त्यामध्ये मंगळवारी आणखी एका सुविधेची भर पडली. बंदीवानांना आपल्या कुटुंबियांशी संवाद साधण्यासाठी ॲलन फोन ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

कारागृहातील बंदी हीदेखील माणसे आहेत. त्यांनाही परिवार आहे. त्यामुळे माणुसकी जपताना कारागृहात त्यांच्यासोबत केवळ गुन्हेगार म्हणून नव्हे तर माणुसकीच्या भावनेतून पहाणे ही मानसिकता ठेवून अलिबाग कारागृहात अनेक सुविधा देण्यात आल्या आहेत बंदीवानांना आपल्या कुटुंबियांशी संवाद साधण्यासाठी ॲलन फोन ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. पत्रकार महेश पोरे यांच्या हस्ते काही बंदीवान यांना स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.यावेळी कारागृह अधीक्षक अशोक कारकर, वरिष्ठ तुरुंग अधिकारी रामचंद्र रणनवरे, निरीक्षक शशिकांत निकम उपस्थित होते.

अलिबाग जिल्हा कारागृह हायटेक होत आहे. कारागृह अधीक्षक अशोक कारकर, वरिष्ठ निरीक्षक रामचंद्र रणनवरे, शशिकांत निकम यांनी बंदिवानांसोबत जपलेली माणुसकीची भूमिका प्रशंसनीय आहे. कारागृहात पिण्याच्या पाण्यासाठी आरओची सुविधा आहे. शिवाय कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशीन, इ मुलाखत आणि १५ दिवसातून एकदा कुटुंबियांशी फोनवर बोलण्याची संधी. या सुविधा असताना त्यात आता ॲलन फोन ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

अप्पर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा प्रशांत बुरडे, विशेष पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर, कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई यांच्या संकल्पनेतून आणि अलिबाग जिल्हा कारागृह अधीक्षक अशोक कारकर यांच्या मार्गदर्शनाखाली, ही ॲलन फोन स्मार्टकार्ड सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेची तांत्रिक बाजू कर्मचारी योगेश राठोड आणि अनिकेत कातमाने हे सांभाळीत आहेत.

या सुविधेसाठी बंदिवान यांना स्मार्टकार्ड देण्यात आली आहेत. ते कार्ड स्वॅप करून त्यांना आपल्या परिवाराशी संवाद साधता येणार आहे. या प्रसंगी एका बंदिवानाने स्मार्टकार्डद्वारे या ॲलन फोनचे उद्घाटन केले.

# मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून साहित्यसंपदा मराठी दीपस्तंभ पुरस्कार जाहीर

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषा संवर्धन ,मराठी साहित्य प्रचार आणि प्रसार या हेतूने स्थापन झालेल्या साहित्यसंपदातर्फे मराठी संवर्धन ,प्रचार प्रसार यांसाठी सातत्याने योगदान देणाऱ्या व्यक्ती ,संस्था यांचा सन्मान साहित्यसंपदा दीपस्तंभ पुरस्काराने करण्यात येतो. मराठी भाषा गौरवदिनाचे औचित्यसाधून साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांनी २०२५ सालच्या मराठी दीपस्तंभ पुरस्कारांची घोषण केली. सन्मानपत्र ,शाल श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असून मराठी भाषा दिन १ मे २०२५ रोजी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारंचे वितरण होईल.

साहित्यिक ,सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यास साहित्यसंपदा सदैव तत्पर असते. नवं साहित्यिकांना रास्त किमतीत पुस्तक प्रकाशित करण्यास सुलभ जावे म्हणून साहित्यसंपदा प्रकाशनातर्फे ८७ पेक्षा जास्त पुस्तकांची निर्मिती आणि प्रकाशन पार पडले आहे. मागील सहा वर्षे मराठी साहित्य ,कला ,संस्कृती संवर्धनास साहित्यसंपदा आपले सातत्याने योगदान देत आहे

सातत्याने रायगड मधील मुरुड विभागात साहित्यिक चळवळ राबविणारी आणि लिहिती नवी पिढी उभारणारी 'कोकण मराठी साहित्य परिषद (मुरुड शाखा )', अनेक साहित्यिक सामाजिक उपक्रम राबवून नवं लेखकांना चालना देणारी 'मराठी साहित्य परिषद ,पिंपरी चिंचवड शाखा' , गेले अनेक वर्ष मराठी गझल प्रचार प्रसार करून नवीन गझलकार तयार करणारी 'नसीमा फाउंडेशन,पनवेल' यांना संस्था स्तरावर बहुमूल्य योगदान दिल्या बद्दल गौरविण्यात येणार आहे.

मराठी साहित्य मंडळ पेणच्या विभावरी जोशी ,पेणचे रसिक आणि साहित्यिक यांच्यातील महत्वाचा दुवा बनलेले माजी सचिव बाळकृष्ण कमळकर आणि माजी अध्यक्ष ,सचिव अश्या विविध पदांवर काम पाहून आपले महत्वपूर्ण योगदान दिलेले 'विलास फडके' यांना व्यक्तिगत स्तरावर गौरविण्यात येणार आहे. तसेच अल्प दरात पुस्तक निर्मितीस हातभार लावून वाचन संस्कृतीस चालना देणारे कोल्हापूर येथील 'भारती मुद्रणालय' ,विदर्भातील ग्रामीण मुलांना हक्काचे काव्यप्रेरणा स्थळ बनलेले कवितेचे घर यांना सुद्धा वाचन संस्कृतीस बहुमूल्य योगदान दिल्या बद्दल गौरविण्यात येणार आहे. साहित्यसंपदातर्फे सगळ्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत


## ALIBAG MUNICIPAL COUNCIL

**(Under Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)**

### NOTICE

No. अनप/न.र/जा.सु.प्र./477/2024-25-Whereas, Development Plan of Alibag (Second Revised) has been sanctioned by Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1712/149/C.R.38/12/UD-12, dated 30th March, 2013 Partly (Excluding E.P. No. 1 to 29) & came into force with effect from 1st May, 2013 and excluded area Development Plan of part (E.P. No. 1 to 29) has been sanctioned by the state government *vide* Urban Development Department's Notification bearing No. TPS-1716/563/C.R.241/2016/UD-12, dated 30th November, 2016 & came into force form 31st December, 2016(hereinafter referred to as "the said Development Plan");

And whereas, C.T.S. No. 512/A/1 & 512B (S.No 157/1) which is located in Wadi Zone to be included in Residential Zone on Development Plan of Alibag Municipal Council;

And whereas, Municipal Council *vide* its Administrative resolution No. 938, dated 12th February 2025 has decided to do C.T.S. No. 512/A/1 & 512B (S.No 157/1)which is located in Wadi Zone to be included in Residential Zone on Development Plan of Alibag Municipal Council under section 37 of the Maharashtra Regional & Town planning Act, 1966 (hereinafter referred to as "Said modifications")

Now therefore, in pursuance of the sub-section (1) of section 37 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, suggestions and objections, if any, with reference to the above proposed modifications are invited in writing from the public within Thirty (30) days from publications of this notification of the notice in *Government Gazette* and these suggestions and objections would be considered by the Municipal Council at the time of submitting the proposed modification to the Government for sanction. Suggestions and objections not received within the prescribed time limit will not be considered by Municipal Council.

Part Plan showing the proposed modification to the "said Development plan" is kept open for the inspection of the public in the Municipal Council office during the working days and working hours.

Alibag
Dated : 24th February 2025

Sign/-
(Sachin Bachchaw)
Administrator &
Chief Officer,
Alibag Municipal Council.

जा.क्र.: 485



## अलिबाग नगरपरिषद

**(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये)**

### जाहीर सुचना

क्रमांक अनप/न.र/जा.सु.प्र./४७७/२०२४-२५- ज्याअर्थी, अलिबाग शहराची सुधारीत विकास योजना (दुसरी सुधारणा) शासन अधिसूचना क्र.टीपीएस-१७१२/१४९/सी.आर.-३८/१२/यु.डी.१२, दिनांक ३० मार्च २०१३ नुसार भागशः (ई.पी. क्र. १ ते २९ वगळून) मंजूर झालेली असून, दिनांक १ मे, २०१३ पासून अंमलात आहे. उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (ई.पी. क्र. १ ते २९) नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टीपीएस-१७१६/५६३/प्र.क्र. २४१/२०१६/नवि-१२, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ नुसार मंजूर असून दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेत सि.स.नं. ५१२/अ/१ व सि.स.नं. ५१२बी (स.नं. १५७/१) या मिळकती वाडी विभागामधून वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करणेचे आहे;

आणि ज्याअर्थी, अलिबाग नगरपरिषदेने प्रशासकीय ठराव क्र. ९३८, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ अन्वये सि.स.नं. ५१२/अ/१ व सि.स.नं. ५१२बी (स.नं. १५७/१) या मिळकती वाडी विभागामधून वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरफार करणेची कार्यवाही करणेच ठरविले आहे. (यापुढे "उक्त फेरफार" म्हणून संबोधिलेला).

आणि त्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) चे तरतूदीनुसार उक्त फेरफाराच्या अनुषंगाने या जाहीर सुचनेद्वार जनतेकडून हरकती व सूचना मागविणेत येत आहेत. हरकती व सूचना लेखी स्वरुपात निम्न स्वाक्षरीकार यांचे नावे ही जाहीर सूचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत कार्यालयीन कामकाजाचे वेळेत सादर कराव्यात, म्हणजे त्याचा विचार उक्त फेरफार प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविताना केला जाईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार केला जाणार नाही. वरील प्रस्तावित फेदबदल दर्शविणारा नकाशा नगर परिषदेच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत व दिवशी अवलोकनार्थ ठेवणेत आलेला आहे.

अलिबाग
दिनांक : २४ फेब्रुवारी २०२५

सही/-
(सचिन बच्छाव)
प्रशासक तथा
मुख्याधिकारी,
अलिबाग नगरपरिषद.

जा.क्र.: ४८५



## ग्रुप ग्रामपंचायत कलोते

मु. कलोते, ता. खालापूर, जि. रायगड.
ई–मेल : grampanchyatkalote@gmail.com

### जाहीर निविदा

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सरपंच ग्रुप ग्रामपंचायत कलोते ता. खालापूर जि.रायगड यांजकडून कळविण्यात येते की, कलोते ग्रामपंचायतीची सन २०२४/२०२५ ग्रामनिधी अंतर्गत खालील कामांची निविदा

| अ. क्र. | कामाचे नाव | निधीचा स्त्रोत | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कलोते सामाजिक सभागृह येथे पुरुष व महिला यांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह व शौचालय बांधकाम करणे. | ग्रामनिधी | ३,०७,१०७/– | ३०७१/– | ३ महिने | ०५/०३/२०२५ स.१० वा. ते सायं. ५ वा. पर्यंत |
| २. | विणेगाव कातळाचीवाडी शाळा दुरुस्ती करणे. (पं.स.सेस) | ग्रामनिधी | २,६५,२३१/– | २६५२/– | ३ महिने | ०५/०३/२०२५ स.१० वा. ते सायं. ५ वा. पर्यंत |

**अटी व शर्ती :**

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडा कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व त्याची फी भरून प्रत उपलब्ध करून देण्यात येईल.
२) नियमानुसार सुरक्षा अनामत व विविध कर बिलातून कपात केले जातील.
३) कामाचे दोष व निवारण कालावधी काम पूर्ण झाल्यापासून ६ महिने पर्यंत राहिल.
४) रीतसर उपरोक्त व अन्य अटीशर्तीबाबत करारनामा करून कार्यारंभ आदेश दिले जातील
५) सदर विकास कामांच्या निविदा ०५/०३/२०२५ रोजी सायं. ५.३० वा ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

**टीप :– इतर अटी व शर्ती व अधिक माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.**

ठिकाण :– कलोते
दिनांक :– २५/०२/२०२५

सही/–
**श्री. निलेश बाळाराम म्हसकर**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत कलोते
ता. खालापूर, जि. रायगड

जा.क्र.: ४१/२०२५

## निवडक

### महाशिवरात्रीनिमित्त श्रीहरी कीर्तन

**नवी मुंबई :** महाशिवरात्रीनिमित्त हभप शितलताई साबळे यांचे श्रीहरी किर्तन बुधवारी (दि.२६) सायंकाळी ७ ते १० वाजतादरम्यान नेरूळ सेक्टर ८ येथील छत्रपती शाहू महाराज गार्डन ठिकाणी आयोजित केले असल्याचे गोमती चॅरितेबल ट्रस्टचे अध्यक्ष नवी मुंबई मनपा माजी नगरसेविका वैशाली दिलीपराव तिडके यांनी कळविले आहे. नेरूळ-जुईनगरमधील भाविकांनी हभप शितलताई साबळे यांच्या अमृततुल्य वाणीतून सूश्राव्य श्री हरि कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे माजी उपसभापती दिलीपराव तिडके यांनी कळविले आहे.

### पनवेलमध्ये गाथा नवरसांची

**पनवेल :** कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन हा महाराष्ट्रभर मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त पनवेल कल्चरल सेंटर 'गाथा नवरसांची' हा कार्यक्रम सादर करीत असून यात साहित्यातील नवरसांचा आविष्कार अनुभवता येईल. कार्यक्रमाची संकल्पना आणि संयोजन वैशाली केतकर यांचे असून लेखन निलीमा देशपांडे यांनी केले आहे. यात वैशाली केतकर, स्वप्ना पेंढारकर, रेणुका दलाल कथा-कविता-स्वगत आणि गीते सादर करतील. ओमकार भुवड गाण्यांना तबलासाथ करील. हा कार्यक्रम रविवारी (दि.२ मार्च) सायंकाळी ६ वा. पनवेल कल्चरल सेंटरचे सभागृह, प्रबोधनकार ठाकरे मार्ग, पनवेल येथे होत असून तो सर्व साहित्यप्रेमींसाठी खुला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क वैशाली केतकर (९९२०४११४९) यांच्याशी संपर्क साधावा.

# नवी मुंबई पालिकेचा ५,६८५ कोटींचा अर्थसंकल्प

- नवीन १४ गावांचा होणार विकास
- शिक्षण, आरोग्याच्या खर्चात काही अंशी कपात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेचा सन २०२५-२६चा पाच हजार ६८५ कोटींचा अर्थसंकल्प पालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांनी सादर केला. मुख्य लेखाधिकारी सत्यवान उबाळे यांनी अतिरिक्त आयुक्त राहुल गेठे व मुख्य शहर अभियंता शिरीष आरदवड तसेच इतर विभागप्रमुख यांच्या उपस्थितीत अंदाजपत्रकाची प्रत महापालिका आयुक्तांकडे सादर केली. यंदा पालिकेने पाच हजारांचा टप्पा पार केला आहे. नवी मुंबई पालिकेत नव्याने समाविष्ट केलेल्या १४ गावांत पुरविण्यात येणाऱ्या नागरी सुविधांसाठीदेखील पालिकेने खर्चात तरतूद केली आहे.



जमा व खर्चाचे अंदाज आरंभीची शिल्लक एक हजार ६८६.०६ कोटी रुपये व जमा तीन हजार ४०३.८२ कोटी रुपये अशी मिळून एकत्रित जमा पाच हजार ०८९.८८ कोटी रुपये आणि तीन हजार ७८८.८४ कोटी रुपये खर्चाचे सन २०२४-२५चे सुधारित अंदाज तसेच एक हजार ३०१.०४ कोटी रुपये आरंभीच्या शिल्लकेसह पाच हजार ७०९.९५ कोटी रुपये जमा व पाच हजार ६८४.९५ कोटी रुपये खर्चाचे आणि २५ कोटी रुपये शिलकेचे नवी मुंबई महापालिकेचे सन २०२५-२६चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाचे ५३४ कोटींचे अंदाजपत्रक परिवहन व्यवस्थापक योगेश कडुसकर व उपक्रमाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुषार दौंडकर यांनी आयुक्तांकडे सादर केले व मंजूर करण्यात आले.

नवी मुंबई महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे ४९ कोटी ९४ लाख रुपयांचे अंदाजपत्रक वृक्ष प्राधिकरण सचिव तथा उद्यान विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे व नयना ससाणे यांनी आयुक्तांकडे सादर केले व तेही मंजूर करण्यात आले.

यंदाच्या अर्थसंकल्पात शिक्षण विभागासाठी १७९ कोटी २९ लाख रुपये तरतूद केली आहे. गेल्यावर्षीपेक्षा काही अंशांनी ही तरतूद कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे शिक्षण विभागात नेमक्या कोणत्या खर्चात कपात करण्यात आली आहे ते पाहावे लागणार आहे. आरोग्यासाठी यंदा मात्र वाढ करण्यात आली असून गेल्यावर्षी २१६.८४ कोटी रुपये असलेली तरतुद वाढवून ती २६३.४८ कोटी इतकी करण्यात आली आहे.

यंदा रुग्णालयात विविध आरोग्य सुविधा अद्ययावत करण्यात येणार असल्याने तरतूद वाढवण्यात आल्याचे दिसत आहे. महानगरपालिकेस विविध करांच्या रुपाने उपलब्ध होणाऱ्या निधीमधून नागरी सेवा सुविधांची पूर्तता होत असते. त्यामुळे उत्पन्नाच्या बाबींकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वस्तू व सेवा करापोटी शासनाकडून मिळणारे सहाय्यक अनुदान व मुद्रांक शुल्क, इतर शासन अनुदाने नवी मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ता कर, नगररचना विभागामार्फत प्राप्त होणारे शुल्क, पाणीपट्टी, मालमत्ता उपयोगिता, विविध सेवा व इतर साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा समावेश आहे.

## चिरनेर येथे आरोग्य शिबिर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण पोलीस ठाणे, सागरी रक्षक दल मच्छिमार बांधव व चिरनेर ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने एक सामाजिक बांधिलकी जपत, चिरनेर ग्रामपंचायतीच्या कार्यालयात सोमवारी (दि.२४) मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ व पोलीसपाटील संजय पाटील, गोपनीय विभागाच्या मानसी तांबोळी, कृषीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांच्या हस्ते या नियोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या आरोग्य शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एक बांधिलकी म्हणून लोकांसाठी दिवस-रात्र सेवा देणाऱ्या पोलीस बांधवांकडून दर एक ते दोन महिन्यातून तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आरोग्य शिबिर राबविले जात असल्याची माहिती या वेळी गोपनीय विभागाच्या मानसी तांबोळी यांनी दिली. या वेळी डॉ.संजय तारलेकर यांच्या सुश्रुशा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल पनवेल तर्फे जनसंपर्क अधिकारी रत्नामाला पाबरेकर आणि स्टाफ यांनी चिरनेर परिसरातील नागरिकांच्या आरोग्य तपास कामी विशेष सहकार्य केले.

दरम्यान, जनसंपर्क अधिकारी रत्नामाला पाबरेकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले, जन आरोग्य योजना, महाराष्ट्र पोलीस, कुटुंब आरोग्य योजना याविषयीची नागरिकांना माहिती दिली. जिओग्राफी, जिओप्लास्टि, कॅथलॅब, डायलिसीस तसेच अतिदक्षता विभाग व इतर सर्व इन्शुरन्स सुविधा उपलब्ध असल्याचे सांगून, सर्व रेशन कार्डधारकांसाठी अँजिओप्लास्टी, पेसमेकर बायपास व इतर शस्त्रक्रिया माफक दरात उपलब्ध असल्याचीही माहिती त्यांनी या वेळी दिली.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल या शाळेमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा मंगळवारी (दि.२५) झाला. वर्षभरामध्ये विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन बक्षीस मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून गव्हाणच्या माजी सरपंच आणि पनवेल तालुका पंचायत समितीच्या माजी सदस्या असलेल्या रत्नप्रभा घरत या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.





त्यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व विद्यार्थ्यांचे भरपूर कौतुक केले. त्यांच्यासोबतच भाजप पनवेल तालुका सरचिटणीस प्रतिभा भोईर, सरचिटणीस शिल्पा म्हात्रे, भाजप सदस्य लीना पाटील असे अनेक पाहुणे या कार्यक्रमाला लाभले लाभले होते. या सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## मॉडर्न स्कूलमध्ये पालवी हस्तलिखिताचे प्रकाशन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून मॉडर्न स्कूलमध्ये पालवी या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले.

२७ फेब्रुवारी हा दिवस ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. हा दिवस मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून् साजरा केला जातो. रयत शिक्षण संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये मोठ्या दिमाखात हा दिवस साजरा करण्यात आला. ग्रंथदिंडी काढून संतांचा तसेच मराठी भाषेचा गौरव करण्यात आला. विविध सांकृतिक कार्यक्रम सादर करून मराठी भाषेला मानवंदना देण्यात आली. इंग्रजी माध्यमिक विभागातर्फे पालवी या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले.

मराठी माध्यमिक विभागातर्फेसुद्धा विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून मराठी राजभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या सुमित्रा भोसले तसेच सर्व विभागप्रमुख आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## सप्तशृंगी देवी मंदिराचा वर्धापन दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीबीडी बेलापूर येथील सप्तशृंगी देवी मंदिराचा २०वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात होम हवन आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'खान्देश भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्याचा कार्यक्रम प्रमुख होता.



या कार्यक्रमासाठी सकाळ मीडियाचे मुख्य संपादक निलेशजी खरे, मुंबई विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. अजय भामरे, एस पी आय टी कॉलेज, अंधेरीचे प्राचार्य डॉ. बी एन चौधरी तसेच आयआयटी पवईच्या संगणक विभागाचे प्राध्यापक डॉ. आर. के. जोशी आणि स्थानिक माजी नगरसेवक अशोक गुरखे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

खान्देशातून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगडमध्ये येऊन विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने खान्देशचे नाव मोठे करणाऱ्या जवळपास ६० सन्माननीय बांधवांचा 'खान्देश भूषण' पुरस्काराने सत्कार करण्यात आला. यात प्रामुख्याने साम टीव्हीचे सिनियर अँकर प्रॉड्युसर गिरीश निकम, सकाळचे मीडियाचे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट (IT). दीपक पाटे, दैनिक लोकमतचे उपवृत्त संपादक नारायण जाधव, वृत्त मानसचे मच्छिंद्र पाटील, जी एस टी विभागाचे जॉइंट कमिशनर. संजय निकम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे, AC patil college, खारघरचे निवृत्त प्राचार्य डॉ.दिलीप बोरसे, आदर्श शिक्षण संस्था, पनवेलचे संस्थापक अध्यक्ष, धनराज विसपुते, खान्देश रहिवासी संघ, खारघरचे अध्यक्ष तसेच बिल्डर मधू पाटील, डॉ. अशोक पाटील, बी.के.थोरात आदींचा समावेश होता.

या कार्यक्रमात खान्देशी विनोदी कलाकार विलास शिरसाठ यांनी आपल्या विनोदी शैलीतून उपस्थितांना खळखळून हसवले. त्यांच्या अहिराणी भाषेतील मिमिक्रीने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

सप्तशृंगी चॅरिटेबल ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी, विशेषतः रमाकांत नागरे, रमेश चित्ते, दौलत पाटील, अॅड. विनोद येवले, अॅड. जितेंद्र पाटील यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले, अशी माहिती ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र रौंदळे यांनी दिली.

## गोठीवली तलाव परिसरात स्वच्छता मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छतेचा मंत्र स्वकृतीतून पटवून देणारे थोर संत गाडगे महाराज यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घणसोली विभागात लोकसहभागातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

घणसोली विभागातील राजीव गांधी तलाव गोठिवली या ठिकाणी तलावाचा जलाशय व परिसराची स्वच्छता करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, परिमंडळ २ उपआयुक्त डॉ.कैलास गायकवाड व घनकचरा व्यवस्थापन परि. २ उपआयुक्त संतोष वारूळे यांच्या नियंत्रणाखाली घणसोली विभागाचे सहा.आयुक्त संजय तायडे व स्वच्छता अधिकारी विजय पडघन यांच्या माध्यमातून ही 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' मोहीम राबविण्यात आली. यामध्ये संत निरंकारी सेवा संस्थेचे पदाधिकारी सदानंद पाटील व संस्थेच्या सदस्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि स्वच्छताकर्मी सहभागी होते. तलाव परिसर स्वच्छ करण्यासोबतच तलावाचा जलाशयही तराफे आणि होडीमध्ये जलाशयात जाऊन स्वच्छ करण्यात आला. स्वच्छता मोहीमा राबविताना व्यापक जनसहभागावर भर देण्यात येत आहे.

### क्लिक...क्लिक...!



**मुरूड : उष्णता वाढली असली तरी सी-गल पक्षी समुद्रकिनारी वास्तव्य करून आहेत. ऑस्ट्रेलिया येथून लांबवरचा प्रवास करून हे परदेशी पाहुणे हिवाळ्यात भारताच्या विविध समुद्रकिनारी येत असतात. यंदा उष्णता वाढूनसुद्धा त्यांनी मुक्काम कायम ठेवल्याने ते पर्यटकांना आकर्षित करून घेत आहेत. समुद्रकिनारी सी-गल पक्ष्यांचे आकर्षक व मनमोहक थवे दिसून येतात.** (छाया : संजय करडे)

## सामाजिक बांधिलकी जपणारे माजी विद्यार्थी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील प्रख्यात विठोबा खंडाप्पा हायस्कूल अर्थात व्ही. के. हायस्कूलच्या माजी विध्यार्थ्यांनी बरोबर २५ वर्षांपूर्वी म्हणजे २६ जानेवारी २००० साली सामाजिक बांधिलकी जपत, समाजसेवेचे उदिष्ट नजरेसमोर ठेवून व्ही. के. ७५ सामाजिक मंडळाची स्थापना केली व या मंडळाच्या माध्यमातून रक्तदान शिबीरे, आरोग्यत तपासणी शिबिरे, हिपेटाइटीस बीचे लसीकरण असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले.



पनवेल तालुक्यातील अती दुर्गम भागातील शाळांमध्ये जेथे शासकीय मदत पोहोचत नाही अशा ५० शाळांना त्यांच्या मागणीनुसार शालोपयोगी साहित्याचे वाटप, तर काही शाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था मंडळातर्फे करून देण्यात आली. व्ही. के. हायस्कूलमध्ये उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेच्या उभारणीसाठीदेखील या मंडळाने मदत दिली आहे. या शाळेतील शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविण्यार्या विद्यार्थ्यांना मंडळाकडून पारितोषिके दिली जातात. अलीकडेच दि. २६ जानेवारी २०२५ रोजी मंडळाला २५ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त मंडळाच्या सदस्यांचे कौटुंबिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली गावीत यांना पन्नास हजार रुपयाचा चेक सुपूर्द करण्यात आला. मंडळाचे उत्साही अध्यक्ष दीपक कांडपिळे, सचिव चिंतामणी जोशी व खजिनदार मुकेश गुप्ते यांच्या मार्गदर्शनाखाली हे समाजसेवेचे व्रत यापुढेही अविरतपणे चालू ठेवण्याचा मंडळाचा मानस आहे.

# माणगाव, श्रीवर्धनमध्ये स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियान

**माणगाव, श्रीवर्धन : प्रतिनिधी**

'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या अभियाना अंतर्गत रायगड झोन ४०अ. परिक्षेत्रातील माणगांव ब्रंच येथे गणपती घाट काळनदी येथील ठिकाणी जलस्रोतांची स्वच्छता करण्यात आली. ज्यामध्ये सुमारे १५० निरंकारी सेवादल स्वयंसेवक व भाविक भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. यासोबतच श्रीवर्धन या ठिकाणी जलस्रोतांची स्वच्छता करण्यात आली ज्यामध्ये सुमारे १२५ निरंकारी सेवादल स्वयंसेवक व भाविक भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला.






संत निरंकारी मंडळाचे सचिव व समाज कल्याण प्रभारी जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले की, देशभरात राबविलेल्या 'अमृत प्रोजेक्ट' परियोजनेच्या दरम्यान सर्व सुरक्षा मानकांचे पूर्णपणे पालन करण्यात आले. युवावर्गाचा विशेष सहभाग हा अभियानाचा मुख्य आधार होता. त्यांनी हेही सूचित केले,की ही मोहीम केवळ एका दिवसापुरती सीमित नाही तर दरमहा विविध घाट व जलस्रोतांची स्वच्छता निरंतर चालू राहील. संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने, पूज्य बाबा हरदेवसिंहजी यांच्या असंख्य दिव्य शिकवणूकींतून प्रेरणा घेत या पावन अभियानाचे आयोजन करण्यात आले.

पूर्वीप्रमाणेच याही वर्षी 'चला सावरु, यमुना किनारे' असा उद्घोष करत या अभियानाला आणखी व्यापक स्वरूप देण्यात आले. २७ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील १६५० पेक्षा अधिक ठिकाणी १० लाखांहून अधिक संख्येने सेवाभावनेने ओतप्रोत स्वयंसेवक भक्तगणांनी एकाच वेळी हे महान अभियान साकारले. हे दृश्य केवळ प्राकृतिक स्वच्छतेपर्यंत सीमित न राहता, अंतर्मनाला निर्मळ आणि पवित्र करण्याऱ्या एका आध्यात्मिक यात्रेचे सुंदर प्रतीक बनले. प्रत्येक श्रद्धाळु भक्ताची समर्पित उपस्थिती या गोष्टीचे प्रमाण होते, की जेव्हा प्रेम, सेवा आणि समरसतेचा दिव्य संगम होतो तेव्हा प्रकृतीही नवजीवनाचा अनुभव घेते.

सतगुरु माताजींनी पाण्याच्या महत्व अधोरेखित करताना समजावले, की पाणी अमृतासमान आहे जे प्रकृतीने आपल्याला सर्वोत्तम उपहाराच्या रुपात प्रदान केले आहे. त्याची स्वच्छता आणि संरक्षण ही केवळ एक जबाबदारीच नव्हे तर आमची स्वाभाविक सवय बनून गेली पाहिजे. बऱ्याचदा आपण अजाणतेपणे आपण वापरा व फेकून द्या अशा वस्तू व घाण जलस्रोतांमध्ये टाकून प्रदूषणात भर घालत असतो ज्यामुळे पर्यावरणाची हानी होते. याच चिंतनातून प्रेरित होऊन 'प्रोजेक्ट अमृत' सारख्या सामाजिक उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे जी जल संरक्षण आणि स्वच्छतेच्या प्रति जागरुकता पसरविण्याचा एक महत्वपूर्ण प्रयास आहे.

बाबा हरदेवसिंहजी यांच्या जन्मदिवसाला समर्पित असलेल्या या पवित्र सेवा अभियानात प्रत्येक भक्ताला जल संरक्षणाच्या दिशेने योगदान देण्याची संधी मिळाली. हा पुढाकार केवळ घाट आणि जलस्रोतांच्या स्वच्छतेवर केंद्रीत नसून घरांमध्येही लहान-सहान सवयींतून जल बचतीला प्रोत्साहित करत आहे ज्यायोगे पाण्याचा आदर व्हावा आणि हे अमूल्य संसाधन भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित राहू शकेल. पर्यावरण सुरक्षेंतर्गत जल संरक्षणामध्ये आपली सकारात्मक सक्रिय भूमिका निभावत ग्लोबल एनर्जी अॅन्ड एन्व्हायरनमेंट फाउंडेशन (जीईईएफ)ने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनला (एसएनसीएफ) प्रतिष्ठित 'वाटर कंजर्वेशन इनिशिएटिव एनजीओ ऑफ द ईयर २०२५' पुरस्कार देऊन गौरविले आहे.

हा गौरवपूर्ण सन्मान एसएनसीएफच्या प्रोजेक्ट अमृत – स्वच्छ जल, स्वच्छ मन आणि त्यातील विविध जल संरक्षण व स्वच्छतेसाठी घेतलेल्या पुढाकाराच्या प्रति अथक समर्पणाचे प्रतीक आहे. नि:संशय जल संसाधनांची शुद्धता आणि सतत संरक्षण करण्यामध्ये एसएनसीएफद्वारे केले जाणारे प्रयास समाजाला स्वच्छ, स्वस्थ आणि समृद्ध भविष्याकडे अग्रेसर होण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावत आहेत.

# शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक सक्षमता महत्त्वाची -बारदेशकर

**धाटाव : प्रतिनिधी**

अद्ययावत तंत्रज्ञानाच्या जोरावर परदेशातील शेती व फळबागा अधिक डौलदार, दर्जेदार आहेत. शेतीला सर्वंकष वातावरण अत्यंत पोषक आहे हे अद्यापही फारसे आपल्याकडे घडत नाही. शेतीत कालानुरूप बदल करणे क्रमप्राप्त वाटत आहे. बांधावरचा शेतकरी असलो तरीही कृषी माहितगार शेतकरी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक सक्षमता महत्त्वाची आहे असे मौलिक मार्गदर्शन रोहा इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष, उद्योगपती पी.पी. बारदेशकर यांनी केले ते रोहा येथे बोलत होते.



जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी अलिबाग, श्री विवेकानंद रिसर्च न्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट रोहा आयोजीत प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या १९वा हप्ता वितरण प्रक्षेपण कार्यक्रमात उद्योजक पी पी बारदेशकर बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सतीश बोराडे, उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे, तंत्र अधिकारी सदानंद लोमटे, रवि कावळे, तालुका कृषी अधिकारी महादेव करे, व्हीआरटीआयचे सुशील रुळेकर, मंडळ कृषी अधिकारी अमोल सुतार, प्रथमेश डांगे, मजूर फेडरेशनचे हेमंत ठाकूर, बळीराजा फाऊंडेशनचे संस्थापक राजेंद्र जाधव, अध्यक्ष विठ्ठल मोरे, सिटी ऑफ फ्लॉवर्सचे सुरेंद्र निंबाळकर, प्रगत शेतकरी अनंत मगर व कृषी अधिकारी उपस्थित होते.

प्रास्ताविकात तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी किसान कार्ड संबंधी नोंदणी व पडताळणी अधिक सोपे करण्यावर महसूल व कृषी विभाग समन्वय साधेल, शेतकऱ्यांना अधिक सोयीचे होईल अशी सुलभ प्रक्रीया लवकरच दिसून येईल असे आश्वासित करत करे यांनी किसान सन्मान योजनेचे महत्त्व विषद केले. कृषी पर्यवेक्षक श्रीकांत जाधव यांनी पीएम किसान योजनेची अंमलबजावणी करत असताना येणाऱ्या अडचणी त्यावर उपाय, वंचित शेतकरी यांनी कोणती कार्यवाही करणे गरजेचे आहे, यावर सहज सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उद्योजक पी.पी. बारदेशकर यांनी देशविदेश कृषी तंत्रज्ञानातील फरक समोर आणला. आपली शेती अधिक समृद्धी करण्याची गरज आहे. त्यासाठी बदल स्वीकारणे क्रमप्राप्त आहे.

कोकणातील शेती बांधाबांधात गेली आहे. शेती क्षेत्र वाढत असल्याचे समाधान असताना शेतकऱ्यांत अधिक सक्षमता येणे महत्त्वाचे आहे. अलिकडे रोह्यातील तरुणांनी युवा कृषी उद्योगाची स्थापना करून सामूहिक शेतीचा बॅन्ड आणला. यशस्वीही केला. हा सामूहिक शेतीचा प्रयोग कृषी क्षेत्रात क्रांती आणणारा ठरेल, असे गौरवोद्गार बारदेशकर यांनी काढले. बांधावरचा शेतकरी असलो तरी कुळाजात शेतकरी आहे. माहितगार आहे अशी मिश्किलता व्यक्त करत बारदेशकर यांनी शेतकऱ्यांना तंत्रज्ञान स्वीकारत सक्षम होण्याचा कानमंत्र या वेळी दिला.

कार्यक्रमात उपस्थित शेतकऱ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा किसान सन्मान सोहळा थेट प्रक्षेपण दाखविण्यात आला. यावेळी सीएसटीचे अतुल पाटील यांनी कॅम्प लावून ईकेवायसी वंचित लाभार्थ्यांची समस्या निवारण करणे, नवीन लाभार्थीची नोंद करणेसंबधी माहिती दिली. जिल्हास्तरीय किसान सन्मान कार्यक्रमाला प्रगतशील शेतकरी, उद्योजक, शेतकरी गट, महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी अधिकारी महादेव करे, व्हीआरटीआयचे सुशील रुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी अधिकारी, कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# श्रीवर्धनमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्सव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथील सार्वजनिक वाचनालय व कोकण मराठी साहित्य परिषद शाखा श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिन उत्सव अत्यंत उत्साहाने साजरा केला जाणार आहे. या ऐतिहासिक दिवशी मराठी भाषेच्या महत्त्वावर प्रकाश टाकणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

या दिवशी सकाळी ९ ते ११ दरम्यान वाचनालयाच्या सभागृहात विविध मराठी साहित्याची प्रदर्शनी ठेवण्यात येणार आहे. या प्रदर्शनीत मराठी भाषेतील महत्त्वाचे ग्रंथ, लेखन, आणि प्रसिद्ध लेखक यांच्या कार्यांचा परिचय करून दिला जाईल. साहित्यप्रेमींना या प्रदर्शनीतून मराठी साहित्याच्या ऐतिहासिक परंपरेचा सखोल अनुभव घेता येईल

संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात कथाकथन, अभिवाचन आणि काव्यवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात साहित्यप्रेमी आपले कथा, कविता वाचन करून मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेला साजरा करतील. या वेळी साहित्यिक कार्यांद्वारे मराठी भाषेचा गौरव आणि सांस्कृतिक वारसा सशक्तपणे पुढे नेला जाईल.

मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना आपण सर्वांनी या कार्यक्रमात भाग घ्या आणि मराठी भाषेचा गौरव करा. वाचनालय श्रीवर्धन व कोकण मराठी साहित्य परिषद शाखा श्रीवर्धन यांच्या वतीने या उत्सवाचे आयोजन करतांना मराठी वाचन संस्कृतीला पुढे नेण्याची महत्त्वाकांक्षा व्यक्त केली जात आहे. सर्व नागरिकांना या ऐतिहासिक कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अवयवदानाबाबत व्याख्यान

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे महाविद्यालयात 'अवयवदानाचे महत्त्व' या विषयावर सोमवारी (दि.२४) व्याख्यान आयोजित करण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्या आणि पर्यावरण सल्लागार रश्मी नरेंद्र जोशी यांनी अवयवदानाबाबत माहिती दिली.



उती आणि अवयवदान करण्याची प्रक्रिया, कायदेविषयक तरतुदी, दान करण्यासाठी अटी याबाबत सौ.जोशी यांनी प्रेझेंटेशन सादर केले. ब्रेन डेड झालेली एक व्यक्ती अवयव दानातून किमान आठ जणांना जीवदान देऊ शकते हे तथ्यदेखील विद्यार्थिनींना या सत्रामुळे माहीत झाले.

या कार्यक्रमासाठी मोरे महाविद्यालयाचे प्रा. प्रसन्न म्हसळकर, प्रा. दिपाली वारंगे, प्रा. प्रतिमा भोईर, प्रा. शिल्पा खाडे, प्रा मयुर पाखर आणि ९१ विद्यार्थीनी उपस्थित होते.

आयोजन सायन्स असोसिएशन प्रमुख प्रा.विजीता पडवळ आणि एनएसएस कमिटी प्रमुख प्रा. मयुर पाखर यांनी केले.

# मुरुड चर्मकार समाज प्रतिष्ठान अध्यक्षपदी आत्माराम नांदगावकर

**मुरुड, रेवदंडा : प्रतिनिधी**

मनन गेस्ट हाऊस काशीद येथे मुरुड तालुका चर्मकार समाज बांधवांची सभा घेण्यात आली त्या सभेमध्ये एकमताने आत्माराम नांदगावकर यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

यासोबतच उपाध्यक्षपदी राजू म्हशीलकर, खजिनदार रमेश पेणकर, सचिव म्हणून कृष्णा वाडेकर, सह सचिव पंकज पेणकर आय, माजी अध्यक्ष सुरेश नांदगावकर, माजी सेक्रेटरी गणेश नागोठणेकर यांची सल्लागारपदी, प्रणय धोंडसेकर, खेमराज नांदगावकर, दिलीप रोहेकर, संदीप मुरुडकर यांची संघटक पदी निवड करण्यात आली. सभेसाठी नितीन पुगावकर राकेश मुरुडकर आदी मान्यवर व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



तालुका संघटनेचे माजी अध्यक्ष सुरेश नांदगावकर, माजी सचिव गणेश नागोठणेकर यांनी नवनियुक्त अध्यक्ष व सर्व कार्यकारणी सदस्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. सुरेश नांदगावकर यांनी आपल्या मनोगतात त्यांनी आपल्याकडून आपल्याला समाजाचे ऋण फेडण्याकरिता आपली नियुक्ती करण्यात आलेली आहे. आपल्याकडून समाजपयोगी भरीव कार्य व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, त्याचप्रमाणे कार्यकारणीच्या सदस्यांनी आपापले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये विद्यमान अध्यक्ष आत्माराम नांदगावकर यांनी आपली अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

# महाशिवरात्रीला माणगावच्या संगमेश्वर मंदिरात विविध कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या संगमेश्वर मंदिरात सालाबादप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.



बुधवारी महाशिवरात्री निमित्त सकाळी ४ ते ६ वाजता अभिषेक, त्यानंतर सकाळी ७ वाजल्यापासून संपूर्ण दिवसभर दर्शनासाठी मंदिर खुले राहणार असून सायंकाळी ७.३० वाजता महाआरती घेण्यात येणार असून या महाआरतीला माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप, माणगाव तालुका उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, माणगाव तहसीलदार दशरथ काळे, माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्षा हर्षदा काळे, सर्व आजी, माजी नगरसेवक, नगरसेविका उपस्थित राहणार आहेत.

या महाआरतीला भक्तगणांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन देवस्थान ट्रस्टचे प्रभारी अध्यक्ष संजयअण्णा साबळे यांनी केले आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव हा तालुका रायगड जिल्ह्यातील आकाराने सर्वात मोठा तालुका म्हणून प्रसिध्द असला तरी प्राचीन परंपरा ब्रिटीशकालीन पूल इमारती आणि कोकणातील प्रसिध्द व्यापारी पेठ यामुळे माणगाव गावाला जास्त महत्त्व प्राप्त होत गेले. राजकीयदृष्ट्या 'स्व.अशोकदादा साबळे' यांचे माणगाव म्हणूनही या तालुक्याची ओळख आजही फार महत्वाची ठरत असली तरी सहाव्या ते सातव्या शतकात या माणगावात फार मोठा पराक्रम होवून गेल्याचे येथील काही प्राचीन मूर्तींच्या आधाराने स्पष्ट होत आहे.

आज काळ आणि गोदनदीच्या संगमावरील श्री संगमेश्वर देवस्थानच्या मंदिराच्या जिर्णोद्धारामुळे व मूर्त्यांच्या प्राणप्रतिष्ठापनेमुळे माणगाव गावाला धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त होत आहे. श्री संगमेश्वराची कहाणी :- ई.स.१६३० साल माणगावमध्ये जोगळेकर या शेतकऱ्याचा शेत नांगरताना नांगराच्या फाळाला टणक दगड लागला व त्यातून पाणी येवू लागले. पहिल्या दिवशी जोगळेकरांनी तितकस मनावर घेतलं नाही. पुन्हा दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी दुध येवू लागले आणि पुन्हा तिसऱ्या दिवशी त्या ठिकाणी रक्त येवू लागले. त्यामुळे सर्व गावात एक आश्चर्याचे वातावरण पसरू लागले. सर्व ग्रामस्थ एकत्र जमले आणि त्या शेतातील सर्व माती काढू लागले. हळूहळू तो दगड म्हणजे एक मोठी शिवपिंड असल्याचे जाणवले.

स्वयंभू शंकराने माणगावात गोद आणि काळ नदीच्या संगमावर भाविकांना दर्शन दिले होते. तेंव्हापासून या स्थानाला श्री संगमेश्वर असे संबोधू लागले. त्यानंतर माणगाव गावाला एका धार्मिक स्थानाच महत्व प्राप्त होवू लागले. या मंदिराच्या जवळच मारुतीचे मंदिर आहे. श्री क्षेत्र संगमेश्वर मंदिरात महाशिवरात्रीच्या पूजा अर्चा केली जाते.

# महाशिवरात्रीनिमित्त अखंड नामयज्ञ सोहळ्याचा शुभारंभ

## वंजारपाडा येथील शिवमंदिरात चार दिवसांचा उत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वंजारपाडा येथील महाशिवरात्री निमित्त ग्रामस्थ मंडळाच्या वतीने अखंड नामयज्ञ सोहळ्याचे आयोजन केले आहे. २४ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी या कालावधीत येथील श्री भगवान शंकर यांच्या मंदिरात हा सोहळा साजरा करण्यात येणार असून आज या सोहळ्याचा शुभारंभ झाला.



वंजारपाडा ग्रामस्थ यांच्या माध्यमातून भगवान शंकराचे मंदिर उभारण्यात आल्यानंतर तेथे महाशिवरात्री निमित्त अखंड नामयज्ञ सोहळा आणि श्री ध्यानेश्वरी पारायण सोहळा सुरू झाला आहे. २४ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी या कालावधीत येथील शिव मंदिरात सुरू झालेल्या अखंड नामयज्ञ सोहळ्याची सुरुवात गंगा पुजा करून झाली.त्यासाठी गावातील असंख्य महिला यांनी नदीचे पाणी आपल्या डोईवर घागर भरून आणले आणि त्या पाण्यात श्री भगवान शंकराचे स्नान करण्यात आले. त्यासाठी गावातील पुरुष आणि महिला भाविक यांनी सहभाग घेतला होता आणि मिरवणूक काढून गंगा पूजनसाठी पाणी आणण्यात आले.

सद्गुरू जानकीनाथ महाराज यांच्या हस्ते श्री भगवान शंकराचे शिवलिंगाचे स्नान घालण्यात आले. या वेळी श्री ग्रंथराज ध्यानेश्वरी पूजन, कलश पूजन, तुळशी पूजन, ध्वज पूजन, वीणा पूजन आदी धार्मिक विधी उरकण्यात आले.त्या आधी सकाळी काकडाने या अखंड नामयज्ञ सोहळ्याला सुरुवात झाली.या साडे तीन दिवसांच्या अखंड नामयज्ञ सोहळ्यात काकडा,संगीत भजन, प्रवचन, सामुदायिक हरिपाठ, हरीकीर्तन आणि जागर भजन आदी कार्यक्रम होतील.

अखंड नामयज्ञ सोहळ्यात पुणे येथील हभप नीलमताई पोतले वडघुळे, राजगुरुनगर येथील हभप वैभव महाराज गाढवे, त्र्यंबकेश्वर येथील हभप रामायणचार्य योगेश महाराज धात्रक यांची हरी कीर्तन होणार असून २७ फेब्रुवारी रोजी काल्याचे कीर्तन मनमाड येथील हभप द्यानेश्वर महाराज भोगीर यांचे होणार आहे. तर २६ फेब्रुवारी रोजी सकाळी महाशिवरात्रीनिमित्त शिवभिषेक सोहळा साजरा होणार आहे.

सायंकाळी गाव प्रदक्षिणा निमित्त गावातील सर्व महिला वर्ग डोईवर तुळशी वृंदावन घेवून सहभागी होणार आहेत. या सोहळ्यात शिव प्रासादिक भजन मंडळ देवपाडा, माऊली वारकरी भजन मंडळ वंजारपाडा, शिवशक्ती भजन मंडळ यांची जागर भजन होणार आहेत. तर नरेश महाराज पाटील आणि गणेश महाराज खांबाळे यांचे प्रवचन होणार आहे. महाशिवरात्रीचे दिवशी २६ फेब्रुवारी रोजी दीपोत्सव होणार असून सद्गुरू जानकीनाथ बाबा यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफीतून पाकिस्तान ‘आऊट’

## न्यूझीलंडच्या बांगलादेशवरील विजयाने आशा संपुष्टात

**रावळपिंडी : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद असलेल्या पाकिस्तानचा संघ यंदाच्या स्पर्धेतून बाहेर झाला आहे. स्पर्धेतील सहावा सामना न्यूझीलंडविरूद्ध बांगलादेश यांच्यात खेळवला गेला. न्यूझीलंड संघाने बांगलादेशचा सहा विकेट्सने पराभव केला. न्यूझीलंडच्या या विजयासह पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५मधून बाहेर झाला.

तब्बल ३० वर्षांनंतर पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचे यजमानपद भूषवण्याची संधी मिळाली होती. १९९६मध्ये झालेल्या विश्वचषकाचे यजमानपद पाकिस्तानकडे होते. त्यानंतर थेट आता २०२५च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानला मिळाले होते. पाकिस्तानचा संघ २०१७मधील चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेता संघ होता. म्हणजेच या स्पर्धेतील गतविजेता संघ होता, पण पाकिस्तान आता गट सामन्यांतूनच बाहेर झाला आहे.



पाकिस्तानला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून ६० धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले, तर दुसऱ्या सामन्यात भारताकडून सहा विकेट्स आणि ४५ चेंडू राखून पराभव पत्करावा लागला. सलग दोन सामन्यांमधील पराभवाने आता पाकिस्तान आणि बांगलादेशचा संघ गट सामन्यांमधूनच स्पर्धेतून बाहेर झाला आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अ गटातून भारत आणि न्यूझीलंड हे संघ सेमी फायनलसाठी पात्र ठरले आहेत. भारत आणि न्यूझीलंडने सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकत थेट सेमीफायनल गाठली आहे.

दरम्यान, बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात न्यूझीलंड संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. बांगलादेशने ४५ धावांवर पहिली विकेट गमावली आणि त्यानंतर ठराविक अंतरासह संघाने विकेट्स गमावल्याचा फटका बसला. बांगलादेशकडून कर्णझार नझमुल शांतोने नऊ चौकारांसह ७७ धावांची खेळी केली, तर जाकेर अलीने ४५ धावांची, रिशाद हुसैनने २६ धावांची आणि तन्झीद हसनने २४ धावांची खेळी करत संघाला २३६ धावांपर्यंत नेले. न्यूझीलंडकडून मायकेल ब्रेसवेलने आपल्या फिरकीच्या जाळ्यात बांगलादेशी फलंदाजांना अडकवले आणि १० षटकांत २६ धावा देत चार विकेट्स घेतल्या. विल्यम ओरूकने दोन, तर हेन्री, जेमीसनने प्रत्येकी एक विकेट घेतली.

बांगलादेशने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंड संघाची सुरुवात काही खास झाली नाही. त्यांनी केवळ ७२ धावांत ३ विकेट गमावल्या. यानंतर रचिन रवींद्रने शानदार फलंदाजी करत शतक झळकावून आपल्या संघाला विजयाकडे नेले. रचिन (१०५ चेंडूत १२ चौकार आणि एका षटकारासह ११२ धावा) आणि कॉन्वे (३० धावा) यांनी मॅचविनिंग भागीदारी रचली. न्यूझीलंडने हे लक्ष्य ४६.१ षटकांत पाच गडी गमावून पूर्ण केले.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत रायगडच्या सोहेल शेखला रौप्यपदक

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मानाची मानली जाणारी महाराष्ट्र केसरी स्पर्धा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने २२ ते २३ फेब्रुवारीदरम्यान पुणे जिल्ह्यातील लोणीकंद येथे झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना ५५ किलो वजनी गटात कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुल खोपोलीचा पैलवान सोहेल शेख याने रौप्यपदक जिंकले.

सोहेलने पहिल्या ग्रीको रोमन महाराष्ट्र केसरी स्पर्धेत वरिष्ठ गटातील कोल्हापूर, पुणे, नाशिक, सोलापूर येथील नामवंत मल्लांना अस्मान दाखवत अंतिम फेरीत प्रवेश केला आणि अंतिम फेरीत अगदी शेवटच्या क्षणी सुवर्णपदकाने हुलकावणी दिली असली तरी तमाम प्रेक्षकांची मने जिंकत रौप्यपदकाची कमाई केली. विशेष म्हणजे सोहेल हा या स्पर्धेतील वयाने सर्वात



लहान मल्ल असूनही त्याची वरिष्ठ गटातील पहिलीच स्पर्धा होती.

सोहेलला कुस्तीमहर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलाचे संस्थापक अध्यक्ष तथा शासनाचा गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार विजेते राजाराम कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले आहे. सोहेल सध्या स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या कांदिवली येथील कुस्ती सेंटरमध्ये महाराष्ट्र शासनाचे कुस्ती कोच अमोल यादव, राजसिंग चिकारा, शाम बुट्टा यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे.

या यशाबद्दल आमदार महेंद्र थोरवे, तहसीलदार अभय चव्हाण, आयुब तांबोळी, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खोपोलीचे मुख्याधिकारी पंकज पाटील, पोलीस निरीक्षक शीतल राऊत, सचिन पवार, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनुर, प्रकाश वाघ, क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मारुती आडकर, तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष डॉ. सुनील पाटील, सचिव जगदीश मरागजे आदींनी सोहेलचे अभिनंदन केले.

# गाईल्स शिल्ड स्पर्धेत ज्ञानदीप संघ उपविजेता



**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईतील बीकेसी येथे झालेल्या १२३व्या गाईल्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेत नवी मुंबईच्या सीवूड्स येथील ज्ञानदीप शाळेचा क्रिकेट संघ उपविजेता ठरला.

ज्ञानदीप शाळेच्या संघाचे संस्थेचे अध्यक्ष रवींद्र नाईक, कार्यकारिणी सदस्य सुरेखा तांडेल, विजय नाईक, पालक, विद्यार्थ्यांकडून जंगी स्वागत करण्यात आले. या वेळी विद्यालयातील बँड पथक, लेझीम पथक, आरएसपी पथक, स्काऊट व गाईड पथक व विद्यार्थ्यांनी विजेत्या संघातील खेळाडूंची मिरवणूक काढली.

प्राचार्य रत्नाकर तांडेल यांनी उत्कृष्ट गोलंदाज महंमद अली, उत्कृष्ट फलंदाज पियुष कुमार तसेच महाराष्ट्र ज्युनिअर संघात स्थान मिळवलेल्या श्रीयुष चव्हाण यांचे विशेष कौतुक केले. त्याचप्रमाणे संघाचे प्रमुख प्रशिक्षक अब्दुल यांचा सन्मान करण्यात आला.

या सत्कार सोहळ्यास माध्यमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक प्रकाश पाटील यांच्यासह दर्शना भोईर, दीपिका म्हात्रे, शिक्षकवर्ग उपस्थित होता.

# आंतरराष्ट्रीय वुशू स्पर्धेसाठी राकेश बेदी यांची निवड

**उरण : बातमीदार**



आयएनएस टुनिर (भारतीय नौदल) उरण येथील अग्निशमन मुख्यालयातील नागरी संरक्षण कर्मचारी राकेश बेदी यांची ॲक्रोपोलिस आंतरराष्ट्रीय वुशू स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा २८ ते २ मार्चदरम्यान ग्रीसमधील अथेन्स येथे होणार आहे.

बेदी हे वुशू, जु-जित्सू आणि ज्युडो खेळाडू आहेत. त्यांची आगामी २०२५ वर्ल्ड गेम्स (चीन) ॲथलिट आणि आशियाई चॅम्पियनशिप २०२५ (जॉर्डन) साठीदेखील निवड झाली आहे.

यापूर्वी बेदी यांनी ३७वे राष्ट्रीय खेळ, वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२४, नॉर्डिक कप २०२४मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले आहे.

# रेवदंड्याच्या मुली चॅम्पियन! कराटे स्पर्धेत जिंकला विजेतेपदाचा चषक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पनवेलमध्ये झालेल्या ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत रायगड जिल्हा कराटे असोसिएशन, रेवदंड्याच्या मुलींनी विजेतेपदाचा चषक जिंकला. त्यांनी सात सुवर्ण, १० रौप्य व १७ कांस्य अशी २४ पदके जिंकली.

स्पर्धा पनवेल तालुक्यातील तारा येथील भानुबेन प्रवीणशहा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात झाली. या स्पर्धेत रायगड जिल्हा कराटे असोसिएशन रेवदंडा प्रशिक्षित २२ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता. त्यांना जेएसडब्लू साळाव कंपनीचे सहकार्य व आर्थिक पाठबळ, तर रायगड जिल्हा कराटे असोसिएशनचे प्रशिक्षक सिहान नंदकुमार वरसोलकर, सेन्साय प्रशांत



म्हात्रे व ओमकार वरसोलकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या रेवदंड्याची कराटेपटू गायत्री चुनेकर हिने दोन सुवर्णपदकांसह बेस्ट फायटर किताब पटकाविला. संस्कृती म्हात्रे, सिद्धी मानकर, अनया पाटील, आर्या विचारे, जीविता गोवर्धने यांनी सुवर्ण; प्राची ठाकूर, संस्कृती म्हात्रे, स्वरा जाधव, सिद्धी मानकर, भार्गवी वर्तक, सृष्टी सावंत, श्रुती सातामकर, निधी मोरे, धनश्री सकपाळ यांनी रौप्य; तर ईश्वरी नाईक, ईश्वरी घरत, मृदूला पाटील, अर्पिता डिके, कृतिका म्हात्रे, भार्गवी वर्तक, आर्या विचारे, सिद्धी मुंगळे, सृष्टी सावंत, आर्या पाटील, जीविता गोवर्धने, दुर्वा उमटे, श्रीशा साळावकर यांनी कास्यपदक मिळविले.

सर्व यशस्वी कराटेपटू मुलींचे साळाव जेएसडब्लू फांउडेशन तसेच पालक, मित्रवर्ग, हितचिंतक तसेच प्रशिक्षक यांनी अभिनंदन केले.

# युपी वॉरियर्सचा आरसीबीवर ‘सुपर’ विजय



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

युपी वॉरियर्सचा संघ वूमन्स प्रीमियर लीगच्या इतिहासातील पहिल्याच सुपर ओव्हरमध्ये विजयी ठरणारा पहिला संघ ठरला आहे. युपी संघाने सुपर ओव्हरच्या थरारक सामन्यात आरसीबीचा त्यांच्या घरच्या मैदानावरच पराभव केला. युपीच्या या ऐतिहासिक विजयाची स्टार सॉफी एकलस्टन ठरली. तिने या सामन्यात फक्त गोलंदाजीच नाही, तर फलंदाजीतही उत्कृष्ट कामगिरी केली.

या लढतीत यूपी संघाने नाणेफेक जिंकून बंगळुरूला प्रथम फलंदाजीसाठी निमंत्रित केले, मात्र बंगळुरूची सुरुवात चांगली झाली नाही. कर्णधार स्मृती मंधाना अवघ्या सहा धावा काढून बाद झाली. त्यानंतर मात्र डॅनी वेट-होग (५७) आणि एलिस पेरी ( नाबाद ९०) यांनी केलेल्या दमदार फलंदाजीच्या जोरावर बंगळुरूने निर्धारित २० षटकांत ६ बाद १८० धावांपर्यंत मजल मारली.

या आव्हानाचा यूपीने जोरदार पाठलाग केला, मात्र त्यांच्या फलंदाज ठरावीक अंतराने बाद होत गेल्या. १९व्या षटकाअखेर त्यांची अवस्था ९ बाद १६३ अशी झाली होती. अखेरच्या षटकात यूपीला विजयासाठी १८ धावांची गरज असताना रेणुका सिंह यांनी जबरदस्त फलंदाजी केली. तिने षटकात दोन षटकार आणि एक चौकार ठोकत संघाला विजयासमीप नेले. शेवटच्या चेंडूवर एक धाव धाव हवी असताना सोफी एकेलस्टोन धावबाद झाली आणि सामना टाय झाला.

यानंतर रंगलेल्या सुपर ओव्हरमध्ये यूपीला एका षटकात केवळ आठ धावाच करता आल्या, मात्र नऊ धावांचे माफक लक्ष्य पार करणे बंगळुरूला जमले नाही. एकेलस्टोनच्या भेदक माऱ्यासमोर रिचा घोष आणि स्मृती मंधाना यांना अवघ्या चार धावाच करता आल्या आणि बंगळुरूला हा सामना गमवावा लागला.

# मध्य रेल्वेच्या खेळाडूंची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत चमक

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या खेळाडूंनी उत्तराखंडमधील देहराडून येथे झालेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पाच सुवर्ण, ११ रौप्य आणि १० कांस्य अशी एकूण २६ पदके जिंकून चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेत मध्य रेल्वेच्या एकूण ३० खेळाडूंनी भाग घेतला.

वैयक्तिक स्पर्धेत अंकिता ध्यानीने ॲथलेटिक्समध्ये तीन पदके (दोन सुवर्ण व एक रौप्य) जिंकली. तेजस शिरसेने पुरुषांच्या ११० मीटर हर्डल्स शर्यतीत सुवर्णपदक जिंकत राष्ट्रीय खेळांचा एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. वंशिता वर्माने महिला वेटलिफ्टिंगमध्ये सुवर्णपदक जिंकले.

विजेत्या खेळाडूंमध्ये १६ खेळाडू मुंबई विभागातील, चार पुणे विभागातील आणि दोन खेळाडू सोलापूर विभागातील आहेत. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

# ऑस्ट्रेलिया-आफ्रिका सामना पावसामुळे रद्द

**रावळपिंडी** : चॅम्पियन्स ट्रॉफीतील ऑस्ट्रेलिया वि. दक्षिण आफ्रिका यांच्यातील सेमीफायनलच्या दृष्टीने महत्त्वाचा सामना पावसामुळे रद्द झाला. रावळपिंडीमध्ये हा सामना खेळवला जात होता, पण सुरुवातीपासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली आणि नाणेफेक न होताच सामना रद्द करण्यात आला. दोन्ही संघांना एकेक गुण देण्यात आला आहे.

आता ब गटात अधिक चुरस आहे. द. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया दोन्ही संघ समान तीन गुणांवर आहेत, पण आफ्रिका रन रेटमध्ये वरचढ आहे. इंग्लंड आणि अफगाणिस्तान यांच्यातील सामनाही महत्त्वाचा असणार आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com